# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, २८ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २७४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# देशाच्या आर्थिक स्वातंत्र्यलढ्यात डॉ मनमोहन सिंग यांचे नाव अजरामर

## निधनाबद्दल विविध मान्यवरांच्या शोकसंदेश

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२७ डिसेबर : जागतिक दर्जाचे अर्थतज्ञ व भारताचे देशाचे माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबाबत देशभरातून दुःख व्यक्त करण्यात येत आहे त्यांच्या निधनामुळे केंद्र सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला असून विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी,पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याबाबतच्या आठवणी जागा करून त्यांना आदरांजली वाहिली आहे. त्यापैकी काही मान्यवरांच्या प्रतिक्रिया अशा:

**देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा देण्याचं काम केले : शरद पवार**

डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनाची बातमी ऐकून अतीव दुःख झाले. आपल्या देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, द्रष्टा सुधारणावादी आणि जागतिक धुरंधर नेता गमावला आहे. त्यांच्या रूपाने एक ईश्वरीय आत्मा स्वर्गाच्या प्रवासाला निघून गेला ही अतिशय वेदनादायक बातमी आहे. डॉ. मनमोहन सिंह विनयशीलता, सहनशीलता, सहिष्णुता आणि करुणेचे प्रतीक होते. भारताची आर्थिक सुधारणा घडवून आणणारे हे महान व्यक्तिमत्त्व येणाऱ्या पिढ्यांसाठी अक्षय्य प्रेरणास्त्रोत राहिल.

स्वातंत्र्याच्या नंतर अनेक वर्ष वेगवेगळ्या पद्धतीने देशाची सेवा करण्यासाठी डॉ. मनमोहन सिंग यांनी योगदान दिले. आज ते आपल्यात नाहीत आणि त्यामुळे होणारी अस्वस्थता वेगळी आहे. मनमोहन सिंग यांचा पिंड हा राजकारणी नव्हता. ते एक उत्तम अर्थशास्त्रज्ञ होते, विचारवंत होते आणि सतत देशाचे उद्याचे भवितव्य घडविण्यासाठी काय करायची आवश्यकता आहे, याचा विचार करण्याची भूमिका घेत होते,

त्यांचा आणि माझा परिचय हा मुंबईत झाला होता. मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असताना ते रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून मुंबईत काम करत होते. त्यामुळे साहाजिकच कधी ना कधी, कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे आमचा सुसंवाद होत असे. त्यामुळे एक प्रकारे त्यांच्याबद्दलचे आकर्षण माझ्या



मनामध्ये निर्माण झाले. नंतरच्या काळात चंद्रशेखरसिंह हे देशाचे पंतप्रधान झाले आणि त्यांच्या कार्यकाळात आर्थिक सल्लागार म्हणून त्यांचे जे काही सहकारी होते. त्यांच्यामध्ये मनमोहन सिंग सुद्धा होते. त्यानंतरच्या काळात नरसिंहराव यांचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यानंतर मनमोहन सिंग यांच्याकडे अर्थखात्याची जबाबदारी आणि मी तेव्हा संरक्षण मंत्री होतो. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या ज्या एक दोन समित्या तयार करण्यात यायच्या, त्यामध्ये आम्ही दोघे सुद्धा होतो. त्यामुळे आम्हा सर्वांना त्यांचे विविध विषयातील निर्भीड विचार ऐकण्याची संधी मिळत असे. ते मितभाषी होते, पण आपल्या भूमिकेशी पक्के होते. देशाच्या पंतप्रधान पदाची जबाबदारी त्यांच्याकडे आल्यानंतर त्या १० वर्षामध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा देण्याचे काम त्यांनी केले. आर्थिक संकटाच्या काळात देशाला सावरण्याचे काम त्यांनी नरसिंहराव पंतप्रधान असताना केले आणि स्वतः पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी अधिक भरीव असे निर्णय घेऊन देशाला मोठ्या आर्थिक संकटातून बाहेर काढले. त्यांच्या १० वर्षांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वाचे असे ९,१० निर्णय त्यांनी घेतले आणि सबंध देशाला एका वेगळ्या दिशेला नेण्याचे काम त्यांनी केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा त्यांची मोठी प्रतिष्ठा होती,

**देशाने प्रशासक, अर्थतज्ञ गमावला : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने एक उमदा प्रशासक, अर्थतज्ञ गमावला आहे, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री, पंतप्रधान अशा विविध भूमिकांमधून त्यांनी काम केले आणि देशवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या राजकारणात स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अर्थशास्त्राशी संबंधित विपूल लेखन सुद्धा त्यांनी केले. त्यांनी केलेले कार्य कायम देशवासियांच्या स्मरणात राहील.

**भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याचा पाया रचला : उपमुख्यमंत्री अजित पवार**

भारतासारख्या विकसनशील देशाला जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या वाटेवर नेण्याचा क्रांतिकारी निर्णय घेणारे आणि तो निर्णय कमालीचा यशस्वी करुन दाखवणारे देशाचे माजी पंतप्रधान, जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ डॉ. मनमोहनसिंह यांचं निधन ही देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्राची मोठी हानी आहे. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याच्या कार्याचा पाया त्यांनी रचला. गेल्या अनेक दशकात आलेल्या प्रत्येक जागतिक मंदीसमोर भारताची अर्थव्यवस्था पाय घट्ट रोवून भक्कमपणे उभी राहिली, याचं बहुतांश श्रेय डॉ. मनमोहनसिंह यांनी देशाचे अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्याकाळात घेतलेल्या दूरदष्टीपूर्ण निर्णयांना आहे,

### डॉ.मनमोहन सिंग यांचे निधनामुळे सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

**भारत सरकारने दु:ख व्यक्त करत भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाची घोषणा केली आहे. त्यांचे निधन २६ डिसेंबरला रात्री नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात झाले. डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे भारत सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दुखवटा २६ डिसेंबर २०२४ पासून १ जानेवारी २०२५ पर्यंत पाळला जाईल. या काळात राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल आणि कोणतेही शासकीय मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत. डॉ. मनमोहन सिंग यांना शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. तसेच, त्यांच्या अंतिम संस्काराच्या दिवशी देश-विदेशातील सर्व भारतीय दूतावासांमध्येही राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.**

**दूरदृष्टी असलेले राजकीय नेतृत्व हरपले : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

डॉ मनमोहन सिंग यांनी आधी वित्तमंत्री आणि नंतर पंतप्रधान असतांना देशाच्या आर्थिक विकासाला वेग देणारी दमदार पाऊले उचलली आणि अर्थव्यवस्थेचे दरवाजे खुले करून एक नवी आर्थिक क्रांती आणली

साध्या सरळ आणि शांत स्वभावासाठी ओळखल्या जाणाऱ्या मनमोहन सिंग यांनी एक नामवंत अर्थतज्ञ म्हणून ख्याती मिळवली होती. त्यांच्या निधनाने एक धोरणी आणि हुशार असा ज्येष्ठ अर्थतज्ञ आणि दूरदृष्टी असलेले राजकीय नेतृत्व हरपले आहे

**महान अर्थशास्त्री, प्रमाणिक, संवेदनशील राजकारणी काळाच्या पडद्याआड : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले**

देशाच्या मजबूत अर्थव्यवस्थेचा पाया घालणारे, थोर अर्थशास्त्री आणि विद्वान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे एक प्रामाणिक, संवेदनशील राजकारणी आणि यशस्वी पंतप्रधान काळाच्या पडद्याआड गेले आहेत, आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय आणि राजकीय राजकीय कारकिर्दीत भारताच्या मजबूत अर्थव्यवस्थेचा त्यांनी पाया घातला. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशात आर्थिक उदारीकरणाच्या मार्गाने अर्थव्यवस्थेला चालना दिली. २००४ साली देशाचे पंतप्रधन म्हणून त्यांची निवड करण्यात आली. सोनिया गांधी यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवत त्यांनी देशाला जागतिक पटलावर एक आर्थिक सत्ता म्हणून भारताला मान्यता मिळवून दिली. पंतप्रधान पदाच्या काळात माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षा कायदा, शिक्षण हक्क कायदा, मनरेगा असे कायदे करून त्यांनी सर्वसामान्यांच्या अधिका-यांना कायद्याचे रूप देत संविधानाने दिलेले अधिकार शेवटच्या रांगेतील लोकांना मिळतील याची काळजी घेतली. दहा वर्षाचा पंतप्रधान पदाचा कार्यकाळ देशाच्या इतिहासातील प्रगतीचा सुवर्णकाळ म्हणून लक्षात राहील. डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनामुळे काँग्रेस पक्षाचे व देशाचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले असून भारताने एक महान सुपुत्र गमावला आहे.

**जागतिक दर्जाचा अर्थतज्ज्ञ, मुत्सद्दी संसदपटू गमावला – राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन**

डॉ. मनमोहन सिंग हे जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ, मुत्सद्दी आणि संसदपटू होते. अर्थमंत्री या नात्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढले आणि जागतिकीकरण व उदारीकरणाच्या मार्गावर नेले. विनम्रता, सौजन्य आणि विद्वत्तेसाठी ओळखले जात. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांमधून त्यांनी संसदेतील चर्चांचा स्तर उंचावला. त्यांच्या निधनामुळे भारताने जागतिक ख्याती लाभलेले अर्थतज्ज्ञ, संसदपटू व विद्वान व्यक्तिमत्व गमावले आहे.

**इतिहास त्यांचा गौरव करेल : राज ठाकरे**

डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर इतिहास कधीच क्रुद्ध होणार नाही, उलट त्यांचा गौरव करेल . भारतीयांमध्ये मग ते उद्योजक असोत, व्यावसायिक असोत, की नोकरदार वर्ग असो, अधिक उत्तम काहीतरी करावे, यासाठी 'ये दिल मांगे मोअर..' ही जी वृत्ती भिनली आहे, त्याचे शिल्पकार हे डॉ. सिंग आहेत. त्यांच्याबद्दल जगभरात एक उत्कृष्ट अर्थतज्ज्ञ म्हणून आदर होता, पुढारलेल्या देशांचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान यांच्या कृतीतून आणि वक्तव्यातून तो दिसून यायचा. जगभरातील अनेक विद्यापीठांमध्ये त्यांच्या ज्ञानाचा आणि कार्याचा गौरव झाला होता. इतकी बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व असलेल्या मनमोहन सिंगांनी न बोलता, शांतपणे जे करून दाखवले ते अनेकांना बोलून पण करून दाखवता आलेला नाही.

**भारताच्या आर्थिक महासत्तेचा पाया रचणारे नेतृत्व हरपले : खा. वर्षा गायकवाड**

डॉ. मनमोहनसिंग यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळेच भारताने आर्थिक क्षेत्रात जगात मोठा टप्पा गाठला आहे. अत्यंत साधे व्यक्तिमत्व, मितभाषी असणाऱ्या डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनाने भारताच्या आर्थिक महासत्तेचा पाया रचणारे दूरदृष्टीचे नेतृत्व हरले आहे, आव्हानात्मक काळात त्यांनी भारताला अत्यंत आवश्यक असलेले आर्थिक नेतृत्व, जागतिक मान्यता, स्थिरता आणि एकता प्रदान केली. उगवत्या भारताच्या इतिहासात एक अर्थशास्त्रज्ञ आणि राजकारणी म्हणून त्यांचे योगदान कायमचे कोरले जाईल. डॉ. मनमोहनसिंग यांचा वारसा परिवर्तनशील नेतृत्वाचा आहे, जो पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहिल.

# चिमुकल्या बहिणींच्या अत्याचार अन् हत्येने पुणे हादरलं, शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे राजगुरुनगरमध्ये पोहचल्या

पुणे : पुण्याच्या राजगुरुनगरमध्ये शेजारीच वास्तव्यास असणाऱ्या परप्रांतीय ५४ वर्षीय नराधमाने चिमुकल्या मुलींवर अत्याचार करुन खून केल्याची घटना घडली आहे. या घटनेचा सर्वत्र निषेध नोंदवण्यात येत आहे. दरम्यान, शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या राजगुरूनगरमध्ये पोहचल्या असून त्यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. या घटनेनं पुणे हादरल्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे थेट राजगुरूनगरमध्ये पोहचल्यात. नराधम आरोपी अजय दासच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती नीलम गोऱ्हे घेतायेत. त्यानंतर पीडित कुटुंबाची सांत्वनपर भेट त्यांनी घेतली आहे.

**मुलींवर अत्याचार थांबवायचे असतील तर...– नीलम गोऱ्हे**


राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. यानिमित्ताने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याची कबुली विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे दिली. नीलम गोऱ्हे यांनी राजगुरूनगरमध्ये जाऊन नराधम आरोपी अजय दासच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती गोऱ्हेनी घेतली. त्यानंतर पीडित कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली. या कुटुंबाला आर्थिक मदत दिली जाईल, मात्र या मदतीमुळं त्या दोन्ही चिमुकल्या परत येणार नाहीत. त्यामुळं मुळतः ही विकृती ठेवण्याची गरज आहे. यासाठी सरकार कठोर पावले उचलेल, असा विश्वास गोऱ्हेनी व्यक्त केला.

आता यापुढं परप्रांतीयांच्या नोंदी ठेवण्याची गरज आहे. सोबतच ते ज्या राज्यातून येतायेत तिथली त्यांची पार्श्वभूमी पाहणं आवश्यक आहे. त्यासोबतच स्थानिकांनी भाडेकरूंच्या नोंदी ठेवण्यासाठी आग्रह धरायला हवा. असं गोरेंनी नमूद केलं. चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी व्हायला हवी, यासाठी आम्ही ही पाठपुरावा करू. असं म्हणतानाचं फास्टट्रॅक मध्ये चालणारे खटले पुढे ट्रॅकवर किती फास्ट चालतात, हे पाहणं आणि प्रलंबित प्रकरणं निकाली लावण्यासाठी न्यायालय दोन शिफ्टमध्ये करावीत, अशी मागणी करताना न्यायव्यवस्था सुबक करण्यावर सरकारने भर द्यावा. असं ही गोऱ्हेनी नमूद केलं.

राजगुरूनगरमध्ये घडलेली घटना ही खळबळजनक आणि संताप आणणारी घटना आहे. असा विकृतपणा आपल्या उत्तर पुण्यात फारसे घडलेले नाहीत. चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून हत्या करणे ही अशोभनीय गोष्ट आहे. औद्योगिक वसाहतींमध्ये रोजगारासाठी येणाऱ्या कामगारांची माहिती ही घर मालकांनी देण्याची गरज आहे. यासाठी जागरूक राहायला हवं, तेंव्हा अशा घटना आपल्याला टाळता येतील, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे नेते शिवाजी आढळरावांनी दिली आहे.

सरकार याबाबत कठोर पावलं उचलत आहे. या पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार. आर्थिक मदतीसाठी प्रयत्नशील राहीन. लोकसंख्या वाढलेली आहे. पोलिसांकडे प्रत्येकाची माहिती कशी येणार? प्रत्येक घरात कोण राहत आहे, हे पोलीस घरा-घरात जाऊन चौकशी कशी करेल? हे शक्य आहे का? त्यामुळं नागरिकांनी सहकार्याची भूमिका ठेवायला हवी. असेही ते म्हणाले.

# दिल्ली विद्यापीठात हिंदू धर्मावर पीएच डी करण्याची संधी




नवी दिल्ली : दिल्ली विद्यापीठात हिंदू धर्मावर पीएच डी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या संदर्भात सेंटर फॉर हिंदू स्टडिज या विभागाने दिल्ली विद्यापीठाच्या प्रशासनापुढे एक प्रस्ताव ठेवला आहे. हा प्रस्ताव मंजूर झाला तर नव्या शैक्षणिक वर्षापासून दिल्ली विद्यापीठात हिंदू धर्मावर पीएच डी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. दिल्ली विद्यापीठाने मंजुरी दिली तर नव्या शैक्षणिक वर्षात जास्तीत जास्त दहा विद्यार्थ्यांना हिंदू धर्मावर पीएच डी करण्याची संधी होईल. विद्यापीठ प्रशासनाच्या मंजुरीनंतर हिंदू धर्मावरील पीएच डी अभ्यासक्रमाबाबतची माहिती दिल्ली विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध होणार आहे. वेबसाईटवरील अभ्यासक्रमाच्या माहितीसोबतच या पीएच डी साठीचे पात्रता निकष दिल्ली विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवर जाहीर केले जातील.

सेंटर फॉर हिंदू स्टडिज या विभागाच्या प्रस्तावानुसार दिल्ली विद्यापीठातून हिंदू धर्मावर पीएच डी करण्यासाठी गठक्र/छएढ पात्रतेसह हिंदू धर्माशी संबंधित अभ्यासक्रमात किमान ५५ टक्के गुणांसह मास्टर्सची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्याला दिल्ली विद्यापीठाची पीएच डी पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. आरक्षण श्रेणीतील विद्यार्थ्याने हिंदू धर्मावर पीएच डी करण्यासाठी अर्ज केला तर त्याला पात्रतेच्या निकषात नियमाआधारे सवलत दिली जाईल. याबाबतची सविस्तर माहिती दिल्ली विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवरून दिली जाईल.

अभ्यासक्रमाला मिळणाऱ्या प्रतिसादाचा आढावा घेऊन हिंदू धर्मावरील पीएच डी साठीच्या जागा वाढवण्याबाबतचा प्रस्ताव दिल्ली विद्यापीठाच्या प्रशासनापुढे ठेवू, असे सेंटर फॉर हिंदू स्टडिज या विभागाने सांगितले.

# कर्जाची रक्कम जमा न करता स्वतः लाटली, कोटक महिंद्राच्या कर्मचाऱ्यांचा प्रताप

बीड, २७ डिसेंबर : कर्ज धारकाने नियमितपणे बँकेचे हप्ते बँकेत जमा केलेले असता. कोटक महिंद्रा या बँकेच्या कर्मचारी व मॅनेजर यांनी सदर रक्कम बँकेत जमा न करता स्वतः लाटली असल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे.

गाडी मालकांनी वाहनांवर घेतलेल्या कर्जाची पूर्ण परतफेड केल्यानंतर बँकेमध्ये HP-TER साठी अर्ज केले असता,कोटक महिंद्रा या बँकेच्या कर्मचाऱ्यांनी संबंधित गाडीमालकांना खोटे फॉर्म नंबर ३५ बनवून दिले. सदर बाब बीड कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास येताच संबंधितावर आज बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे भांदवि अन्वये शासनाची-वाहन कर्ज धारकांची संगनमताने फसवणूक केली तसेच बनावट कागदपत्रे शासकीय कार्यालयात सादर केले बाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समिती बैठक

## जलजिवन मिशन कामांचा स्वतंत्र समितीमार्फत आढावा; येत्या १० जानेवारीला प्रत्यक्ष गावात पाहणी- खा.भुमरे

छत्रपती संभाजीनगर, दि.२७(जिमाका):- प्रत्येक घरी नळाद्वारे पाणीपुरवठा करणारी महत्त्वाकांक्षी योजना जलजिवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात होत असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी एक स्वतंत्र समिती गठित करावी. तसेच या समितीने येत्या १० जानेवारीला प्रत्यक्ष गावात जाऊन कामांची सद्यस्थिती पहावी,असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीचे अध्यक्ष खा. संदिपान भुमरे यांनी आज दिले.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण अर्थात दिशा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पार पडली. अध्यक्षस्थानी खासदार संदिपान पाटील भुमरे हे होते. तसेच राज्याचे इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नुतनीकरण मंत्री अतुल सावे, विधानसभा सदस्य आ. प्रशांत बंब, आ. रमेश बोरनारे, आ.संजना जाधव, आ. अनुराधा चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिणीयार, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनिल भोकरे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर तसेच सर्व यंत्रणा प्रमुख आदी उपस्थित होते.

प्रारंभी माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या निधनाबद्दल दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीत केंद्रशासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. त्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), स्वच्छ भारत मिशन शहरी, जलजीवन मिशन, एकीकृत बालविकास योजना, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण अभियान, समग्र शिक्षा अभियान, राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन, महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजना, राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम अशा विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात जलजिवन मिशन अंतर्गत झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांची सद्यस्थिती जाणून घेणे आवश्यक असल्याचे मत आ. प्रशांत बंब यांनी मांडले.

# उमरी शहरातील खासगी पेंट्रीकार चालवणाऱ्या तरुणाचा खून



उमरी - एक्सप्रेस रेलगाड्यात दररोज खासगी पेंट्रीकार चालवणाऱ्या अनिल माधव आडगुलवार याचा खून झाल्याची घटना गुरुवारी रात्री मामा चौक येथे घडली. मासेमारी तलाव घेण्याच्या कारणावरून खून झाला असल्याच्या संशयावरून उमरी पोलिसानी एका परिवारास ताब्यात घेतले असून त्याकडे चौकशी करणे सुरू आहे. शहरातील रापतवारनगर येथील तरुण अनिल माधव आडगुलवार वय -३० हा शहरातील वीस ते पंचवीस तरुण घेऊन दररोज उमरी रेल्वे स्थानकांदरम्यान धावणाऱ्या देवगिरी एक्सप्रेस, इंटरसिटी एक्सप्रेस आदी रेलवे गाड्या दरम्यान उमरी -सिकंदराबाद दरम्यान खासगी पेंट्रीकार चालवीत असे. नेहमीप्रमाणे सिकंदराबाद - मुंबई या देवगिरी एक्सप्रेस गाडीने पेंट्रीकार करून आल्यानंतर,मित्रांसमवेत शहरातील मामाचौक येथे गप्पा मारत असतांना अचानक आलेल्या तिघां -चौघांनी अनिल यांच्या छातीत चाकूने वार केले. गंभीर अनिल हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहून भयभीत झालेल्या मित्रांनी त्यास प्रथोमोपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात आणले.त्यानंतर अतिगंभीर असल्याने डॉक्टरांनी त्यास नांदेड येथे हालवण्याचा सल्ला दिला. नांदेड येथे नेत असतांना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. अतिरिक्त पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी या प्रकरणी आशिष बाबुलाल जयस्वाल, नितीन आडगुलवार, विश्वनाथ उर्फ साईनाथ स्वामी,विशाल शिंदे,नागेश पडोळे आदींना ताब्यात घेतले असून घटनेचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# गॅरेजमध्ये उभ्या असेलेल्या सीएनजी रिक्षामध्ये स्फोट; एकाचा मृत्यू, तिघे जखमी

पुणे : पुण्यात एक अपघाताची विचित्र घटना घडली आहे. पुण्यातील बी टी कवडी रोडवर रिक्षाचा मोठा अपघात झाला आहे. यात गॅरेजमध्ये उभ्या असलेल्या सीएनजी रिक्षामध्ये अचानक स्फोट झाल्याची घटना घडली आहे. हा स्फोट इतका भीषण होता की रिक्षातील एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर या अपघातात इतर तीन लोक जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पुढे आली आहे. पुण्यातील बी.टी.कवडे रस्ता, नवशा गणपतीपुढे भंगार मालाचा साठा असणाऱ्या पत्र्याच्या शेडमध्ये हा स्फोट झाल्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, आज (२७ डिसेंबर) संध्याकाळी ५.३० च्या सुमारास बी.टी. कवडे रोड येथील एका भंगाराच्या दुकानांमध्ये जुन्या फ्रिजच्या गॅस सिलेंडरचा स्फोट झाला आहे. हा स्फोट इतका भीषण होता की या घटनेत एका व्यक्तिचा जागीच मृत्यू झाला असून इतर तीन व्यक्ति जखमी झाले आहेत. या जखमी व्यक्तींना कामी हॉस्पिटलमध्ये रवाना करण्यात आले आहे. आम्ही स्वतः घटनास्थळावर असून पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करून घेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मात्र या अपघाताच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मात्र हा अपघात नेमका कश्यामुळे झाला हे अद्याप कळू शकलेले नाही.

**नागपूरात रिक्षा अपघातात माय-लेकाचा दुर्दैवी अंत**

अशीच एक अपघाताची घटना नागपूरात घडली असून रिक्षा अपघातात माय लेकाचा दुर्दैवी अंत झालाय. रिक्षाची दुभाजकाला धडक बसली आणि पलटी झाला. यातच खासगी कार्यक्रमावरुन येत असलेल्या माय-लेकाने जीव गमावलाय. ही घटना आज (दि.२७) नागपूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. आटो चालक रोहित साखरे व त्याची आई करुणा साखरे असं अपघातात मृत्यू झालेल्यांची नावं आहेत.

# रासायनिक खतांच्या किमतीत वाढ

पुणे : आधीच महागाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना नव्या वर्षात वाढणाऱ्या खतांच्या किमतीला सामोरे जावे लागणार आहे. आता वाढणाऱ्या रासायनिक खतांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडणार आहे. खरीप हंगामात झालेले नुकसान कसे भरून काढावे, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असतानाच अचानक रासायनिक खतांचे भाव वाढल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. रासायनिक खतांच्या किमती आधीच जास्त असताना खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून दरवाढ जाहीर केली आहे. त्यानुसार रासायनिक खतांच्या किमतीमध्ये २०० ते ३०० रुपयांची वाढ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त भार सहन करावा लागणार आहे.




## अनिलपेक्षा तरुण आणि अर्जुनपेक्षा चांगले केस आता माझा लक्ष्य

पुणे : भारतातील प्रमुख हेअर रिस्टोरेशन क्लिनिक युजेनिक्स हेअर सायन्सेस ने एक खास इव्हेंट आयोजित केला, ज्यात बॉलिवूडचे दिग्गज बॉनी कपूर, डॉ. प्रदीप सेठी आणि डॉ. अरिका बन्सल यांचे योगदान होते. या शानदार कार्यक्रमात आधुनिक हेअर रिस्टोरेशन तंत्रज्ञानाचे परिवर्तनकारी प्रभाव साजरे केले गेले, ज्यात बॉनी कपूर यांनी त्यांचा अद्वितीय हेअर ट्रान्सप्लांट अनुभव शेअर केला. बॉनी कपूर यांनी युजेनिक्स सोबत त्यांच्या अनुभवाबद्दल खुलासा करताना सांगितले,स्वत:ची काळजी आणि आत्मविश्वास अनमोल आहेत. या हेअर ट्रान्सप्लांटमुळे माझ्या लुकमध्ये नवचैतन्य आलं आहे आणि माझ्या आत्मविश्वासाला उत्तेजन मिळालं आहे.

## पारितोषिक-प्राप्त चव, खिशात मावणारं परफेक्शन

मुंबई – प्रतिष्ठित आयडब्ल्यूएस अवॉर्ड्स् २०२४ ची सुवर्णपदक मानकरी कार्टेल बदर्स/ब्रोजची प्रमुख स्कॉच व्हिस्की, द ग्लेनवॉक'ने सध्या महाराष्ट्रात वादळ निर्माण केलं आहे. अतिशय स्टायलिश स्वरुपात २०० मिली निप बाटलीत उपलब्ध असलेली ग्लेनवॉक लाट निर्माण करण्यासाठी आणि व्हिस्कीचा अनुभव पूर्वीपेक्षा अधिक उंचीवर नेण्यासाठी सज्ज आहे! आकर्षक ५०० च्या किंमतीत उपलब्ध असलेली निप बाटली आपल्या ग्राहकांना सुलभ आणि किफायतशीर पद्धतीने द ग्लेनवॉक'ची हटके गुणवत्ता आणि स्वाद देण्याकरिता सज्ज आहे. सध्या महाराष्ट्र, द ग्लेनवॉक'च्या एकंदर विक्रीत ६८%चे भरीव योगदान देते आहे. ब्रँडकरिता हे एक प्रमुख राज्य ठरले असून २०० मिलीची निप बॉटल बाजारात दाखल करण्यात आली. द ग्लेनवॉकचे लक्ष्य या प्रदेशातील विक्री चौपट वाढविण्याचे आहे. हे धोरणात्मक पाऊल केवळ लक्षणीय वाढीस चालना देणारे नाही तर व्यापक प्रमाणात खरेदीदारांना लक्षणीयरित्या आकर्षित करताना दिसेल. उत्पादनाचे स्थान बाजारपेठेत मजबूत करेल.

## 'मल्टीप्लायआरआर' लाँच

मुंबई – इक्रेंटिस वेल्थ ॲडवायजरी सर्विसेसने आपले डीआयवाय सोल्यूशन 'मल्टीप्लायआरआर'च्या लाँचची घोषणा केली आहे. हे स्मार्ट व सर्वसमावेशक इक्विटी गुंतवणूक सोल्यूशन नवीन गुंतवणूकदारांसाठी इक्विटी बाजारपेठा अधिक उपलब्ध होण्याजोग्या करून देण्याकरिता डिझाइन करण्यात आले आहे. आजही शेअर बाजार फक्त श्रीमंत व्यक्तींचे क्षेत्र मानल्या जाणाऱ्या विश्वामध्ये या सोल्यूशनचा हे मिथक दूर करण्याचा आणि नवीन गुंतवणूकदारांना लहान गुंतवणूक सुरू करत इक्विटी गुंतवणूकींचा फायदा घेण्यास प्रेरित करण्याचा मनसुबा आहे.या उत्पादन लाँचबाबत मत व्यक्त करत इक्रेंटिस वेल्थ ॲडवायजरी सर्विसेसचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक मनिष गोयल म्हणाले, ''इक्रेंटिसमध्ये आमचा सर्वांसाठी त्यांची गुंतवणूक करण्यायोग्य अतिरिक्त बचत कितीही असो समान संधी देण्यावर दृढ विश्वास आहे. आमच्या मते, संपत्ती निर्मिती मुलभूत अधिकार आहे आणि प्रत्येकजण त्यामध्ये सामील होण्याची संधी मिळण्यास पात्र आहे.

## बचपन प्ले स्कूल ने स्प्राउट सादर केले: भारत का प्रथम एनईपी -अलाइंड कोर्स

पुणे – बचपन प्ले स्कूल, जो प्राथमिक शिक्षणामध्ये एक नामांकित नाव आहे, ने स्प्राउट लाँच केले आहे, जो भारताचा प्राथमिक अभ्यासक्रम आहे जो संपूर्णपणे राष्ट्रीय शिक्षण नीति (एनईपी) २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम पुढे (एनसीएफ-एफएस) २०२२ आहे . हे आता उपलब्ध आहे १२०० ते अधिक शाखांमध्ये आणि ३५,०० तास व्यापक शोध तयार केला गेला आहे, जो नंतर शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवीन मानक स्थापित केला आहे. स्प्राउट का उद्देश भारताची मूलक शिक्षण प्रणाली मध्ये विद्यमान खामियां दूर करणे आहे, एनईपी २०२० के अंतर्गत शैक्षणिक अनुभवात्मक आणि प्रकल्प आधारित विचार मिश्रित केले गेले. त्याच्यासोबत, हा पंचकोष विकास देखील समाजात असतो, जो मुलांचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विकास करू शकतो, त्यामुळे त्यांचा संपूर्ण विकास होऊ शकतो.

## हेअर ट्रान्सप्लांटमुळे माझ्या लुकमध्ये नवचैतन्य

नागपूर : भारतातील प्रमुख हेअर रिस्टोरेशन क्लिनिक युजेनिक्स हेअर सायन्सेस ने एक खास इव्हेंट आयोजित केला, ज्यात बॉलिवूडचे दिग्गज बॉनी कपूर, डॉ. प्रदीप सेठी आणि डॉ. अरिका बन्सल यांचे योगदान होते. या शानदार कार्यक्रमात आधुनिक हेअर रिस्टोरेशन तंत्रज्ञानाचे परिवर्तनकारी प्रभाव साजरे केले गेले, ज्यात बॉनी कपूर यांनी त्यांचा अद्वितीय हेअर ट्रान्सप्लांट अनुभव शेअर केला.बॉनी कपूर यांनी युजेनिक्स सोबत त्यांच्या अनुभवाबद्दल खुलासा करताना सांगितले,स्वत:ची काळजी आणि आत्मविश्वास अनमोल आहेत. या हेअर ट्रान्सप्लांटमुळे माझ्या लुकमध्ये नवचैतन्य आलं आहे आणि माझ्या आत्मविश्वासाला उत्तेजन मिळालं आहे. मी आता आधीपेक्षा अधिक तरुण आणि आत्मविश्वासाने भरलेला आहे, आणि हे प्रत्येकाला मिळायला हवे. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी प्रेक्षकांवर गहिरे परिणाम केले, आणि हेअर रिस्टोरेशनच्या प्रभावाची जाणीव झाली.

## रील आणि रीयल लग्नाबद्दल सांगत आहे आयुषी खुराणा

झी टीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेतील मनाची पकड घेणारे नाट्य. मनोवेधक कथानक आणि उत्तम ऑनस्क्रीन केमिस्ट्री असलेल्या व्यक्तिरेखा यांचा मिलाफ प्रेक्षकांना आवडत आहे. राघव आणि रीत यांच्या भूमिका साकारणारे अनुक्रमे भरत अहलावत आणि आयुषी खुराणा ही प्रेक्षकांची आवडती जोडी बनली असून त्यांच्या 'लव-हेट डायनामिक'ला चाहते खिळून आहेत. हल्लीच्या भागांमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळाले की कसे रीत आणि राघव यांचे आटा साटा विवाह परंपरेअंतर्गत लग्न होते, ज्यातून त्यांच्या भावंडांचे भविष्य सुरक्षित केले जाते. योगायोगाने आयुषीचेही लग्न खऱ्या आयुष्यात त्याच वेळेस झाले.

## पंकज बेरी पुन्हा एकदा धूर्त राजगुरु तथाचार्यांच्या भूमिकेत दिसणार!

सोनी सबवर अलीकडेच सुरू झालेल्या तेनाली रामा मालिकेत यावेळी नवीन गोष्टी असणार आहेत. या मालिकेत अभिनेता पंकज बेरी पुन्हा एकदा धूर्त आणि चाणाक्ष राजगुरु तथाचार्यची भूमिका साकारत आहे.कावेबाज आणि धूर्त स्वभावामुळे तथाचार्य ही व्यक्तिरेखा लोकांना आवडली होती. तथाचार्य या मालिकेत नेहमी तेनालीशी (कृष्ण भारद्वाज) शाब्दिक द्वन्द्व करताना दिसतात. तथाचार्य हे राजा कृष्णदेवराय (आदित्य रेडीज) च्या दरबारातील विद्वान आणि सल्लागार होते. तेनाली विजयनगरला परततो तेव्हा ते त्याच्या मार्गात अडथळे निर्माण करत राहतात. एके काळी विजयनगरमधून बहिष्कृत करण्यात आलेला तेनाली पुन्हा या राज्यात येतो, तेव्हा त्याच्यावर कुरघोडी करून राजा कृष्णदेवरायाच्या दरबारातील आपले प्रभुत्व कायम राखण्यासाठी तथाचार्यांचे खटाटोप सुरू होतात. त्या दोघांमध्ये नेहमी शाब्दिक चकमक होत राहते आणि तेनालीला नामोहरम करण्याच्या तथाचार्यांच्या प्रयत्नातून काही तरी भलतेच परिणाम होतात, ज्यामुळे त्यांच्यातील ही चकमक रंजक होते. त्या दोघांचे सख्य चमत्कारिक आहे.

## सोनी सब च्या कलाकारांचे २०२५ या नववर्षाचे संकल्प

२०२५ हे वर्ष अगदी दाराशी येऊन ठेपले आहे. नववर्षाचे स्वागत करताना, सोनी सबचे कलाकार आपल्या आकांक्षा आणि नवीन वर्षासाठी केलेला संकल्प शेअर करत आहेत. आपल्या विकासाला प्राधान्य देण्यापासून ते नवीन सर्जनशील उपक्रमांचा पाठपुरावा करण्यापर्यंत या कलाकारांनी स्वतःसाठी काही प्रेरणादायक लक्ष्ये निश्चित केली आहेत. 'वागले की दुनिया' आणि 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत काम करणारे कलाकार परिवा प्रणती, नवीन पंडिता आणि गरिमा परिहार आगामी वर्षासाठी आपण काय काय करण्याचे योजले आहे, हे सांगत आहेत. या संकल्पांवरून त्या कलाकारांची आपल्या व्यक्तिगत विकासाबाबतची निष्ठा आणि प्रेक्षकांना आपल्या अभिनयातूनच नाही तर वास्तव जीवनातून प्रेरित करण्याची आणि २०२५ हे एक सकारात्मक, विकासशील आणि अर्थपूर्ण संबंधांचे वर्ष बनवण्याची इच्छा दिसून येते.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

अ.नगर : डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयात सक्षम सार्वभौम नेतृत्व तयार करून परिचर्या क्षेत्राचे भविष्य उज्ज्वल करणे या विषयावर २८ डिसेंबर २०२४ रोजी तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषद विळद घाट येथे सकाळी ८ वाजता सुरू होणार आहे.

आरोग्य क्षेत्रामध्ये होणाऱ्या जलदगती बदलामुळे परिचारिका क्षेत्रामध्ये सार्वभौम, सशक्त व मजबुत नेतृत्याची आवश्यकता भासत आहे. परिचारिका क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नेतृत्वांना दैनंदिन कामकाजात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. आरोग्य क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा परिणाम हा परिचारिका क्षेत्रातील नेतृत्वामध्ये बदल घडवून आणण्यास कारणीभूत आहे. आरोग्यसेवा प्रणालींचा दबाव तसेच आरोग्यसंदर्भातील जागतिक समस्याना सामोरे जाण्यासाठी परिचारिका क्षेत्रामध्ये सार्वभौम सक्षम असे नेतृत्व तयार होणे गरजेचे आहे जेणेकरून परिचारिका क्षेत्राचे भविष्य उज्वल होऊ शकेल. डॉ विखे पाटील परिचर्या महाविद्यालयाचे २० वर्षांपासून कुशल व गुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याचे काम सुरू आहे, त्या निमीत्ताने महाविद्यालयात *सक्षम सार्वभौम नेतृत्व तयार करून परिचर्या क्षेत्राने भविष्य उज्वल करणे* या विषयावर ३ ऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर परिषदेकरिता डॉ पायपर, राहाय्यक प्राध्यापक ग्राउंड कॉलेज, संयुक्त राज्य अमेरिका (यू.एस.ए) या प्रमुख अतिथी असुन 'परिचारिका क्षेत्रामध्ये परिपुर्ण क्षमतेचे नेतृत्व तयार करून परिचारीका सेवेचा दर्जा उंचावणे' या विषयावर आपले मत मांडणार आहेत

डॉ. सर्वेश सुवरेश खन्ना, प्राध्यापक व संस्थापक, इमिरियट्स पेट्रोन, न्यूयॉर्क (अमेरिका) या 'भविष्यातील नेतृत्व व परिचारिका क्षेत्रातील नेतृत्वाचे सक्षमीकरण करणे' ह्या विषयावर व्याख्यान देणार आहेत, डॉ. नानसी डायस, सहाय्यक प्राध्यापक पश्चिम कॅरोलिना विद्यापीठ या अनुकरणीय सार्वभौम नेतृत्व तयार करून परिचर्या क्षेत्रात नेतृत्व उचावणे तसेच मुंबई येथील हिंदुजा हॉस्पिटलच्या संचालक डॉ. फलाक्षी मांजरेकर या सशक्त नेतृत्व तयार करून परिचारीका क्षेत्राची उंची वाढविणे हे विषय माडणार आहेत.

तसेच परिचारीका क्षेत्रात नेतृत्वाचे भविष्य, आव्हान व संधी या विषयावर चर्चासत्र आयोजित केले आहे. या चर्चासत्राकरिता डॉ. शोभा गायकवाड, सहाय्यक प्राध्यापक एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबई या नियंत्रक असतील. तसेच या चर्चासत्रामध्ये सौ. ग्रेसी मथाई, सी. ओ. बेबी मेमोरियल हॉस्पिटल केरळ, डॉ. नीलीमा सोनवणे, अतिरिक्त नर्सिंग संचालक, आरोग्य आयुक्तालय मुंबई, डॉ. अजिता नायर व्यवस्थापकीय संचालक आरोग्यसेवा व्यवस्थापन आणि डॉ. पर्ल क्रूज, लिड हिमॅटोलॉजी रिसर्चक्रीन एलिजाबेथ हॉस्पिटल आय. एन. एच. इंग्लड हे सर्व तज्ञ सहभागी होणार आहेत.

या परिषदेकरिता सुमारे ५२० शिक्षक, परिचारीका व विद्यार्थ्यांनी नोदणी केलेली असून शिक्षक व विद्यार्थी आपले शोध निबंध सादर करणार आहेत.

सदर परिषद यशस्वीरित्या पार पडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील सो, विश्वस्त मा. सौ. शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील तसेच विश्वस्त व मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बजाज ऑटोने लॉन्च केली आतापर्यंतची सर्वोत्तम चेतक

## फ्लॅगशिप ३५ सीरीजचे ३ व्हेरियंट्समध्ये उपलब्ध

पुणे २० डिसेंबर २०२४ : बजाज ऑटो लिमिटेड या जगातील सर्वात व्हॅल्यूएबल २-व्हीलर आणि ३-व्हीलर कंपनीतर्फे आतापर्यंतची सर्वोत्तम चेतक' ही फ्लॅगशिप ३५ सीरिज लाँच करण्यात आली आहे. ही सीरिज तीन व्हेरियंट्समध्ये उपलब्ध असून, नवीन फ्लोअरबोर्ड बॅटरीज, नयीनतम तंत्रज्ञान आणि अतिरिक्त सुरक्षा फीचर्सनी सुसज्ज आहे.

**आतापर्यंतची सर्वोत्तम बजाज चेतक :** ३५ सिरीज' हे नाव ३.५ ज्ञथह क्षमतेच्या शक्तिशाली बॅटरीवरून देण्यात आले आहे. चेतक ३५०१, ३५०२, आणि ३५०३ या मॉडेल्स खास सोयीस्कर राइडिंगसाठी, मोठ्या बूट स्पेससाठी आणि चार्जिंगसाठी लागणारा कमी वेळ यासाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत. यामुळे रायडर्सना लांब अंतराचा प्रवास, अधिक सामान नेणे आणि पुढील राइडसाठी लवकर तयार होणे शक्य होते.

**महत्त्वाची फीचर्स :** सर्वाधिक रेंज : एका चार्जवर १५३ किमीची सुधारित रेंज., सर्वात जलद चार्जिंग: फक्त ३ तासांत ०-८०% चार्जिंग, सर्वात मोठा बूट स्पेस नवीन फ्लोअरबोर्ड बॅटरीजमुळे ३५ लिटरचा अंडर-सीट स्टोरेज मिळते. हे या विभागातील सर्वाधिक स्टोरेज आहे.

**टेकपॅकसह अतिरिक्त फीचर्स :** स्मार्ट टचस्क्रीन कन्सोल: इंटिग्रेटेड नॅव्हिगेशन, म्युझिक कंट्रोल, डॉक्युमेंट स्टोरेज आणि कॉल हँडलिंग यांसारख्या सुविधा

**सुरक्षा फीचर्स :** रिमोट इम्मोबिलायझेशन, गाइड-मी-होम लाईट्स, जिओ-फेन्सिंग, अँटी थेफ्ट आणि ॲक्सिडंट डिटेक्श, चेतक '३५ सिरीज'च्या लॉन्चबाबत बजाज ऑटोच्या अर्बनाईट बिझनसे युनिटचे अध्यक्ष एरिक वास म्हणाले, चेतक १३५ सीरिज हे इलेक्ट्रिक टू-व्हीलर बाजारातील आमच्या सातत्यपूर्ण प्रगतीचे प्रतीक आहे. आम्ही अलीकडच्या महिन्यापर्यंत आमचे आघाडीचे स्थान अधिक भक्कम केले आहे. ही फ्लॅगशिम सीरिज विशेषतः तरुण रायडर्सना आकर्षित करण्यासाठी डिझाइन करण्यात आली असून यात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि निओ-क्लासिक शैलीची सांगड पालग्यात आली आहे. आमच्या सर्वसमावेशक उत्पादन श्रेणीमुळे आता प्रत्येक रायडरसाठी एक चेतक उपलब्ध आहे.'

**हरित प्रवास क्रांतीमध्ये सामील व्हा खास ऑफर्ससह :** ग्राहक भारतभरातील ३.५०० हून अधिक चेतक डीलरशिपला भेट देऊ शकतात किंवा www.chetak.com वर ऑनलाइन टेस्ट राइड बुक करू शकतात. ३५०१ यो डिलिव्हरी डिसेंबरच्या अखेरीस आणि ३५०२ थी डिलिव्हरी जानेवारीत सुरु होण्याची अपेक्षा आहे. ज्यामुळे सर्वासाठी एक हरित नवीन वर्ष सुनिश्चित होईल.

## कृष्णापुर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तन ह भ प रामगिरीजी महाराज किर्तनाने सांगता

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २७ डिसेंबर : पैठण तालुक्यातील कृष्णापुर येथे सालावादाप्रमाणे याही वर्षी अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा , ह भ प वै. सदाशिव महाराज ढाकेफळ ,हभप गुरुवर्य भास्करगिरी महाराज श्रीक्षेत्र देवगड, वै. बाळकृष्ण महाराज सावखेडा यांच्या आशिर्वादाने व हभप संजय महाराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दि . २० डिसेंबर ते दि. २७ आयोजित करण्यात आला होता. दि.२७ डिसेंबर शुक्रवारी रोजी हभप महंत रामगिरीजी महाराज यांच्या कीर्तनाने दहा ते बारा या वेळेत काल्याचे कीर्तनाणे सप्ताहाची सांगता झाली या वेळी ह भ प महंत रामगिरीजी महाराज येळी यांनी मधुर वाणीतून श्रीकृष्ण लीलेवर कीर्तन केले आहे नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले सप्ताह यशस्वीते साठी सप्ताह समिती व समस्त गावकरी भजनी मंडळी यांनी अधिक परिश्रम घेतले.

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू करावे ; पाठपुरावा करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.२७ डिसेंबर – तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसह राज्यांतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू करण्यासाठी आमदार संजना जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य ग्राम पंचायत कर्मचारी महासंघाच्या वतीने निवेदन देऊन केली आहे.

या निवेदनात राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत राज्य शासनाकडे आम्ही गेली तीस वर्षापासून सतत लढे देत आहोत. सन २०१७ मध्ये याच राज्य सरकारने अभय यावलकर समिति नियुक्ती केली होती या समितीने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी अशी शिफारस केलेली आहे

परंतु अद्याप पर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही तसेच २०१७ मध्ये किमान वेतनाची पुनर्रचना व्हायला पाहिजे होती परंतु ती झालेली नाही तेव्हा सुधारित किमान वेतन लागू करावे तसेच वसुलीची अट त्वरित रद्द करावी, शंभर टक्के किमान वेतन राहणीमान भत्त्यासह देण्यात यावे व दर महिन्याला सात तारखेच्या आत पगार करण्यात यावा अशी आपणास राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वतीने तसेच तालुक्यातील कर्मचाऱ्यांच्या वतीने आपणास विनंती करत आहोत की आपण माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समक्ष भेटून आमचे प्रश्न त्वरित सोडवावेत असे नमूद आहे. या निवेदनावर महाराष्ट्र राज्य ग्राम पंचायत कर्मचारी महासंघाचे तालुकाध्यक्ष मच्छिंद चव्हाण, उपाध्यक्ष अनिल मोकासे, रामधून राजपूत, सचिव शैलेश राजपूत, विभाग प्रमुख काकासाहेब मुरकुंडे आदींच्या सह्या आहेत.

# जयभीम दिन,८६ व्या मक्रणपूर परिषद सोहळ्याचे 30 डिसेंबर रोजी आयोजन

## प्रसिध्द वक्ते सुकुमार कांबळे यांचे व्याख्यान

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२७ डिसेंबर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. ३० डिसेंबर १९३८ रोजी, मराठवाड्यातील हैद्राबाद स्वतंत्रता संग्रामाचा, खऱ्या अर्थाने महत्वाचा भाग असलेली, पहिली परिषद संपन्न झाली. याच परिषदेत स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब मोरे यांनी सर्वप्रथम जयभीम चा नारा दिला होता. या दिनाचे स्मरण आणि जयभीम दिनाचा वर्धापनदिन येत्या ३० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता साजरा करण्यात येणार असल्याची माहिती, स्वातंत्र्यसेनानी दलितमित्र भाऊसाहेब प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रविण मोरे यांनी दिली आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, नव्या पिढीला इतिहासाचे व आंबेडकरी विचारांसाठी झटलेल्या व्यक्तिमत्त्वाचे स्मरण व्हावे म्हणून, सालाबादाप्रमाणे या वर्षीही जयभीम दिन व ८६ व्या मक्रणपुर परिषद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर ( ग्रामीण) चे पोलिस अधिक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या हस्ते उद्घाटन होणाऱ्या या परिषदेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ आंबेडकरी विचारवंत सुकुमार कांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार बी. व्ही. जोंधळे, स.सो. खंडाळकर यांची उपस्थिती राहील.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, नगरपालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक नंदकिशोर भोंबे, कन्नड शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रघुनाथ सानप, ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार,नांदेड येथील प्रा.डॉ. राजेंद्र गोणारकर यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सकाळी ११ वाजता कन्नड शहराजवळील मक्रणपूर नर्सरी, (डांगरा ) येथे वंदनीय भिक्खू संघ व धम्मदेसना भन्ते ज्ञानरक्षित महाथेरो यांच्या हस्ते ध्वजारोहण, त्यानंतर मुख्य कार्यक्रम होईल आणि त्यानंतर ख्यातनाम जलसाकार राहुल अन्वीकर आणि पंचशिला भालेराव यांचा प्रबोधनात्मक आंबेडकरी शाहिरी जलसा होणार आहे. अशा या ऐतिहासिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमाचा, जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन स्वातंत्र्यसेनानी दलितमित्र भाऊसाहेब मोरे प्रतिष्ठान व जयभीम मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-७८९

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : आसिफ मोईस शेख रा पांढरी मोहल्ला खुलताबाद ता खुलताबाद जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :-जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः आसिफ मोईस शेखच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः आसिफ मोईस शेखचा जन्म दिनांक २२-०३-१९९७ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः आसिफ मोईस शेखचा जन्म दिनांक २२-०३-१९९७ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः आसिफ मोईस शेखचा जन्म दिनांक २२-०३-१९९७ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/ उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २२-०३-१९९७ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक ....../१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.२१८६/कावि-२१७८ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२५.०७.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :-

प्रकाश धोंडीबा खिल्लारे, वय-३६ वर्ष व्यवसाय- शेती, रा. पळशी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय पळशी, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी प्रकाश धोंडीबा खिल्लारे, रा. पळशी ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक ०४.१२.१९८७ रोजी मौजे पळशी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, प्रकाश धोंडीबा खिल्लारे, यांचा दिनांक ०४.१२.१९८७ रोजी मौजे पळशी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मू. आदेश/प्र.क्र.४५५२/कावि-५१६१ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२३.१२.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- कोमल वामन ढोरमारे, वय-१८ वर्ष व्यवसाय - शिक्षण, रा.मोढा बु.. ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय मोढा बु., ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी कोमल वामन ढोरमारे, रा.मोढा बु. ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक २६.०६.२००६ रोजी मोढा बु. येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की कोमल वामन ढोरमारे, यांचा दिनांक २६.०६.२००६ रोजी मौजे मोढा बु. येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मू. आदेश/प्र.क्र.४५०२/कावि-५११० उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१८.१२.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- कविता सुखदेव जगताप, वय-३५ वर्ष व्यवसाय- मजुरी, रा.शिवना. ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय शिवना., ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी कविता सुखदेव जगताप, रा.शिवना, ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक २०.०७.१९८९ रोजी मौजे शिवना येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की कविता सुखदेव जगताप, यांचा दिनांक २०.०७.१९८९ रोजी मौजे शिवना येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.४४९१/कावि-५०९९ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१८.१२.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार : रुद्र संजय साळवे, वय-०२ वर्ष व्यवसाय - शिक्षण, अ.पा.क. वडील नामे-संजय उत्तम साळवे, वय-२९ वर्ष, व्यवसाय-शेती रा. वडोदचाथा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय वडोदचाथा, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी संजय उत्तम साळवे, रा. वडोदचाथा, ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा मुलगा नामे रुद्र संजय साळवे यांचा दिनांक ०२.०३.२०२३ रोजी मौजे वडोदचाथा येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा- २०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की रुद्र संजय साळवे, यांचा दिनांक ०२.०३.२०२३ रोजी मौजे वडोदचाथा येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.४४८८/कावि-५०९६ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१८.१२.२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार : रुद्रा विलास साळवे, वय-१६ वर्ष व्यवसाय - शिक्षण, अ.पा.क. वडील नामे-विलास लक्ष्मण साळवे, वय-४४ वर्ष, व्यवसाय-शेती रा. वडोदचाथा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय वडोदचाथा, ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी विलास लक्ष्मण साळवे, रा. वडोदचाथा, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा मुलगा नामे रुद्रा विलास साळवे यांचा दिनांक ११.०५.२००९ रोजी मौजे वडोदचाथा येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की रुद्रा विलास साळवे, यांचा दिनांक ११.०५.२००९ रोजी मौजे वडोदचाथा येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

# शेळीपालन प्रशिक्षणातून पशुसखी आत्मनिर्भर होतील- डॉ.भिकाने

## शेळीपालन प्रशिक्षण शिबीराचा उत्साहात निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी:** शेळी पालन प्रशिक्षणातून पशुसखी एक नवा आत्मविश्वास घेऊन जातील व आत्मनिर्भर होतील, असे मत महाराष्ट्र पशु व विज्ञान विद्यापीठ नागपूरचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने यांनी समारोप समारंभात व्यक्त केले केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने माविम प्रकल्पाच्या (मोड्यूल-२) अंतर्गत येथील पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयात २३ ते २७ डिसेंबर या कालावधीत हिंगोली जिल्ह्यातील पशुसखीसाठी ५ दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र पशु व विज्ञान विद्यापीठ नागपूरचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर, गजानन खिरोडकर, जिल्हा प्रकल्प सल्लागार, महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली, डॉ. धनंजय देशमुख, मुख्यप्रकल्प समन्वयक, माविम प्रकल्प, डॉ. संदीप रिंढे, प्रकल्प सह-समन्वयक, माविम प्रकल्प हे उपस्थित होते.

महाविद्यालयात विविध प्रकल्पाअंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणाकरिता प्रशिक्षण घेण्यात



येत असून सदरील प्रशिक्षण हे शेळी पालन करणाऱ्या महिला बचत गटांच्या सक्षमीकारण आणि पशुसखी महिलांचा क्षमता विकास करण्याकरिता आयोजित करण्यात आले असून या प्रशिक्षणतुन पशुसखी एक नवा आत्म विश्वास घेऊन जातील व आत्मनिर्भर होतील, असे मत भिकाने यांनी व्यक्त केले. प्रशिक्षणामधून मिळालेल्या तांत्रिक ज्ञानातून शेळीपालन हा व्यवसाय शास्त्रीय पद्धतीने केल्यास पशुसखीना यशस्वी उद्योजिका होण्यास आणि स्वतःची आथिर्क उन्नती साधण्यासाठी निश्चितच मदत होईल. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या तांत्रिक ज्ञानातून पशुसखीनी आदर्श शेळीपालन फार्म उभारावा अशी अपेक्षा या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गजानन खिरोडकर, जिल्हा प्रकल्प सल्लागार, महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंगोली यांनी प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले. प्रशिक्षण समन्वयक डॉ. संदीप रिंढे यांनी प्रास्ताविकात प्रशिक्षणादरम्यान देण्यात आलेली व्याख्यान, प्रात्याक्षिक इ. विषयी सविस्तर माहिती दिली. पशुसखींनी कौशल्य विकासांतर्गत पाच दिवसांचे निवासी प्रशिक्षण यशस्वी रित्याा पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्राचे वाटप महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डॉ. चैतन्य कदम यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. शुभांगी धायगुडे यांनी केले. महाराष्ट्र पशु व विज्ञान विद्यापीठ नागपूरचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने यांची प्रेरणा तसेच महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.सुधीर राजूरकर यांचे मार्गदर्शन आणि मुख्य प्रकल्प समन्वयक डॉ. धनंजय देशमुख यांचे मदतीने प्रशिक्षणाचे समन्वयक डॉ. संदीप रिंढे तसेच सह-समन्वयक डॉ. ए. एम. चप्पलवार, डॉ. संजयकुमार लोंढे, डॉ. अमोल पाटील, डॉ. मकरंद खरवडकर, सहाय्यक नियंत्रक श्री. संजय खेडकर, सहाय्यक कुलसचिव ऋषिकेश कांबळे आणि लिपिक तथा टंकलेखक श्री. अविनाश जाधव तसेच महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि पदव्युत्तर विद्यार्थी पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. सचिन भुसे, डॉ. लक्ष्मीकांत गट्टेवार, डॉ. संकेत भादुले, डॉ. विजया गुरनाळकर, डॉ. चैतन्य कदम, डॉ. प्रतिक वाघ, डॉ. शुभांगी धायगुडे आणि डॉ. नेहा पुराम परिश्रम आहेत यांनी माविम अंतर्गत प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...

### नागपूर अधिवेशनात उत्तम कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी :** नागपूर येथे पार पडलेल्या राज्याच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान बंदोबस्तावर असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना बुधवारी (दि.२५) प्रमाणपत्र व पदक प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी हिवाळी अधिवेशन बंदोबस्तात नागपूर शहर आयुक्तालयाकडून हिवाळी अधिवेशनादरम्यान प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि समपर्णाने बजावलेल्या उल्लेखनीय सेवेसाठी प्रमाणपत्र व मेडल प्रदान करण्यात आले. ही प्रमाणपत्रे व पदके बुधवारी शहरातील पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या नियंत्रण कक्षामार्फत संबंधित कर्मचाऱ्यांना प्रदान करण्यात आली. यात सेलू येथील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद नानासाहेब देशमुख, शेख वसीम शेख शेरू, गंगाखेड येथील राहुल गौतम लोखंडे, रावसाहेब सदाशिव कदम, पालम येथील मधुकर लक्ष्मण चव्हाण, किशोर सीताराम बनाटे, ग्रामीण पोलीस ठाण्याचे शेख बारी शेख मन्नान, दैठणा येथील लक्ष्मीकांत पांडुरंग कश्यप, सोनपेठ येथील संजय पांडुरंग गजभारे, मानवत येथील दत्तात्रय केरबा मोरे, पाथरी येथील दादाराव पंडित भिंडेकर, पूर्णा येथील अजगर अली मोईनोद्दीन पठाण, जिंतूर येथील शेख रफीक शेख उस्मान, संतोष सखाराम चव्हाण, चारठाणा येथील मुजीब मन्नान शेख, परभणी येथील विजय रवींद्र बांगर, भुमेश्वर सुरज राऊत, संग्राम ज्ञानोबा डोळे, इम्रान नुरल्ला खान पठाण, शिवाजी ज्ञानोबा घुगे यांचा समावेश आहे.

### यशवंत मस्के यांना विद्यावाचस्पती अर्थात पीएचडी पदवी प्रदान

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** शहरातील यशवंत मस्के सर यांना पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठाद्वारा '' विद्या वाचस्पती सारस्वत सम्मानाने सन्मानित करण्यात आले आहे.या समारोहाचे भव्य आयोजन रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी नामांकित हॉटेल सायाजी विजयनगर इंदौर (मध्य प्रदेश) येथे केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू मा.डॉ.इन्दूभूषण मिश्राजी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून देवेंद्र कुमार जैन (सेवानिवृत्त न्यायाधीश म.प्र.भोपाल), डॉ.विष्णुकांत कनकने(प्रदेश प्रभारी मुख्यमंत्री उदय योजना शिक्षण विभाग म.प्र.भोपाल), श्रीमती डॉ. दीपा मिश्रा (सुप्रसिद्ध कथा- वाचिका वृंदावन धाम मथुरा), हे होते तर प्रमूख उपस्थितीत डॉ. विश्वनाथ पाणिग्रही राष्ट्रीय पर्यावरणवादी तथा वर्ल्डरेकॉर्ड प्राप्तकर्ते बागबाहारा जिल्हा महासमुंद( छत्तीसगड), डॉ.शिवाजी शिंदेजी महाराष्ट्र राज्य संयोजक पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ हे मान्यवर मंचावर उपस्थिती होते.

सर्वप्रथमत: मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलित करून कार्यक्रमाला सरुवात झाली.स्वागत समारोहानंतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले त्याा हिंदी तथा नागरी भाषेच्या प्रचार प्रसार व हिंदी भाषेला अधिकृत राष्ट्रीय भाषा मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत केला पाहिजे यावर प्रकाश टाकला गेला.

पदवी दान समारंभात यशवंत मस्के यांच्यासह देशातील विविध ठिकाणाहून आलेल्या सारस्वतांना सर्व मान्यवरांच्या हस्ते मानद पी.एच.डी.अर्थात विद्यावाचस्पती ही पदवी प्रदान करण्यात आली. करीता डॉ.यशवंत मस्के यांचेवर सहकारी मित्रपरिवार व सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### सैन्यामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सीडीएस परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे राज्य शासनातर्फे दि. २० जानेवारी, २०२५ ते ०४ एप्रिल, २०२५ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात येत आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण व निवास भोजन दिले जाते.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

## अग्रीम पीकविमा तात्काळ शेतकऱ्याच्या खात्यात जमा करण्याबाबत निवेदन



**जिंतूर,/प्रतिनिधी:** सोयाबीन पिकाचा मंजूर झालेला अग्रीम पीक विमा शेतकऱ्याचा खात्याात तात्काळ जमा करण्यात यावा कारण सध्या शेतकऱ्याची दयनीय अवस्था आहे शेतकरी अडचणीत असल्यामुळे आपण तात्काळ या मागणीची दखल घेऊन शेतकऱ्याच्या खात्याामध्ये सोयाबीनचा अग्रीम पीक विमा जमा करण्याचे आदेश द्यावे अशी मागणी अखिल भारतीय शिव स्वराज्य सेना परभणी महिला जिल्हाध्यक्ष शितल कदम व प्रभारी जिल्हा अध्यक्ष संजय कुऱ्हाडकर जिल्हा कार्याध्यक्ष शेख सर्फराज यांच्यावतीने रघुनाथ गावडे जिल्हाधिकारी परभणी यांना सदरीत निवेदनाव्दारे देण्यात आली आहे.

## राज्यमंत्री मेघना साकोरे यांच्याकडे जिंतूर बसस्थानकासाठी नवीन बसेसची प्रवासी महासंघटनेकडून निवेदनाव्दारे मागणी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** राज्याच्या राज्यमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांचा जिंतूर येथे नागरी सत्कार ठेवण्यात आला होता. त्याा प्रसंगी महाराष्ट्र राज्य प्रवासी महासंघाच्या वतीने जिंतूर आगारासाठी नवीन बसेस देण्यात याव्या असे निवेदन देण्यात आले.

जिंतूर तालुका हा खूप जुना आहे व येथील बस डेपो परभणी जिल्ह्यात प्रथम आहे. तालुका अंतर्गत ग्रामीण प्रवासी मोठ्या प्रमाणात ये जा करतात. प्रवाशांना बसस्थानकात सुख सुविधा देण्यात यावा व नवीन बसेस व इलेक्ट्रॉनिक बसेस आगारास मिळवून द्यावे अशी मागणी निवेदनात त करण्यात आली. आपण स्वतः जिंतूर तालुक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व प्रवाशाची होणारे हाल लक्षात घेता जिंतूर आगारासाठी नवीन दहा बसेस व इलेक्ट्रॉनिक पाच बसेस परिवहन मंत्री यांना शिफारस करून लवकरात लवकर देण्याची विनंती करावी. जिंतूर



आगारातील स्वच्छता, पाणी, स्वच्छता ग्रह, परिसरातील धुळींचे प्रदूषण कमी व्हावे यासाठी जिंतूर तालुका प्रवासी संघटनेकडून आपणास विनम्र निवेदन सादर करण्यात आले आहे.

याबाबत आपण स्वतः प्रवाशांच्या मागणीकडे आपण स्वतः लक्ष देऊन परिवहन मंत्र्यांकडे शिफारस करून जिंतूर आगारासाठी व प्रवाशांच्या हितासाठी जिंतूर तालुक्यातील प्रवाशांच्या व नागरिकांच्या समस्यांच्या समजून घेऊन मागणीकडे लक्ष द्यावे ही विनंती नामदार राज्यमंत्री बोर्डीकर मेघना साकोरे यांच्या कडे करण्यात आली. त्याा वेळी महाराष्ट्र राज्य प्रवासी महासंघाचे अध्यक्ष तालुकाध्यक्ष सचिन रायपत्रीवार, उपाध्यक्ष महेश देशमुख, बालाजी सोमानी, सह कोषाध्यक्ष संदीप माहूरकर, संघटक किशोर पारडे, कोषाध्यक्ष बाळासाहेब रामपूरकर,सचिव पंकज तिवारी, सहसचिव भागवत चव्हाण, अर्जुन पालवे, सौ.शैला कुलथे, सौ संगीताताई जाधव, सतिष पायघन आदी प्रवासी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. तालुक्यातील प्रवाशांचे हाल बघता प्रवासी महासंघाने नवीन बसेसची मागणी महाराष्ट्राच्या राज्यमंत्री सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांच्याकडे करण्यात आली होती त्यावेळी मंत्री मेघनादीदी बोर्डीकर म्हणाल्या की आपण आपल्या मतदारसंघातील प्रवाशांचे हाल बघत आहेत.

## स्वस्त धान्य मिळत नसल्याची महातपुरी येथील शेख परिवाराची तक्रार

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** तालुक्यातील महातपूरी येथील रहिवासी शेख रोशन इमामसाब, शेख अमर रोशन, शेख समीर रोशन या शेख परिवाराने महातपुरी गावातील स्वस्त धान्य दुकानदार धान्य देत नसल्याची (दि.२६ डिसेंबर गुरुवार) रोजी गंगाखेड तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे.



महातपुरी येथील शेख परिवाराने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गावातील रास्त भाव दुकानदार स्वस्तिक केरबा मुलगीर यांच्या दुकानाशी शिधापत्रिका जोडलेली होती २०१८ पर्यंत व्यवस्थित धान्य मिळत होते परंतु २०१८ नंतर तिघांचे स्वस्त धान्य दुकानदाराने कोणत्याा आधारे आमचे धान्य बंद केले आहे हे मात्र कळू शकले नाही २०१८पासून आमच्या परिवाराला स्वस्त धान्य मिळत नसल्याचे म्हटले आहे स्वस्त धान्य दुकानदार मुलगीर यांच्याकडे धान्यासाठी प्रत्योक महिन्याला जाऊन धान्याची मागणी केली असता धान्य दुकानदार २०१८ पासून जवळपास दहा वेळेस आमचे आधार कार्ड व दोनशे रुपये प्रमाणे अनेक वेळा घेतलें परंतु आतापर्यंत आम्हा परिवारास धान्य मिळाले नाही आम्ही धान्य दुकानदारांना याबाबत विचारपूस केली परंतु वेळोवेळी अडचणी सांगून परत शिधापत्रिका, आधार कार्ड घेऊन परत दोनशे रुपये प्रमाणे पैसे मागितले अनेक वेळा पैसे देऊन देखील आमच्या कुटुंबीयांना आतापर्यंत धान्य मिळाले नाही याची तात्काळ चौकशी होणे अत्यांत गरजेचे असून आमच्या परिवारास शेती नसताना ही शेतकरी योजनेमध्ये आमच्या परिवाराचे नाव आकस बुद्धीने मुद्दामहून टाकण्यात आले आहे पंधरा-वीस एकर शेती असलेल्या शेतकरी नागरिकांना धान्य मिळते पण भूमिहीन गोरगरीब दारिद्र्यरेषेखाली नागरिकांना धान्य मिळत नाही २०१८ ते २०२४ पर्यंत मुलगीर यांच्या स्वस्त धान्य दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार काळाबाजार होत असून प्रमाणापेक्षा वाजवी दराने धान्य विक्री होत असून सदरील गैरव्यवहाराची खातेनिहाय चौकशी करावी व नियमाप्रमाणे आमच्या शिधापत्रिकेवर धान्य सुरू करावे अन्यथा कुटुंबासह आमरन ऊपोषणास बसणार असल्याचे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान मिळेना- दबाब गटाची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी-** सन २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणांत नुकसान झाले. निवडणूकी पूर्वि आपल्या सरकारने शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान जाहीर कले मात्र अद्यापही अनूदान रक्कम शेतक-यांच्या खात्याात वर्ग करण्यात आली नसल्याने अनूदान रक्कम तात्काळ शेतक-यांच्या खात्याात वर्ग करण्याची मागणी सेलू तालूका दबाव गटाच्यावतीने राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे शूक्रवार २७ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जिल्हयातील काही तालुक्यात अतीवृष्टी अनूदान रक्कम शेतक-यांच्या बँक खात्याात वर्ग झाली आहे मात्र सेलू तालूक्यातील शेतकरी मात्र अनूदानाची प्रतिक्षा करत असून अनूदान रक्कम मिळाली नसल्याने नेमके कारण काय?असा प्रश्न शेतक-यांना पडला असून अनूदान कधी येणार या प्रतिक्षेत शेतकरी आहेत. या प्रकरणी व्यक्तिशः लक्ष घालून सेलू तालुक्यातील शेतक-यांना न्याय मिळेल असे सकारात्मक कारवाईचे आदेश जिल्हाधिकारी परभणी यांना तात्काळ द्यावेत अशी मागणी करण्यात आली असून यासाठी सेलू तालूका दबाव गटाचे निमंत्रक अँड. श्रीकांत वाईकर ओमप्रकाहा चाव्हाळ, इसाक पटेल आदी उपस्थित होते.

## मानवत,पाथरी, सोनपेठ या तीन तालुक्याच्या विकासासाठी रेल्वे मार्ग महत्वाचा असून यासाठी मी प्रयत्न करणार- आ.विटेकर

**मानवत,/प्रतिनिधी-** पाथरी विधान सभा मतदार संघातील मानवत ,पाथरी व सोनपेठ या तीन तालुक्याच्या विकासासाठी रेल्वे मार्ग हा अतिशय महत्त्वाचा असून मानवत रोड ते परळी व्हाया मानवत,पाथरी,सोनपेठ, या रेल्वे मार्गाला २०१६ मध्ये मंजुरी मिळाली २०१८ मध्ये सर्वे पूर्ण झाले या रेल्वे मार्गाला राज्य सरकारची मान्यता असणे गरजेचे आहे मान्यता नसल्याने हा रेल्वे मार्ग रखडलेला आहे.

तसेच मानवत व रेल्वे स्टेशनला व्यापारी महाविद्यालयीन विद्यार्थी सरकारी कर्मचारी व साई भक्तांना पाथरी येथील साईबाबा जन्मभूमीच्या दर्शनाचा लाभ व्हावा या हेतूने तसेच मानवतरोड रेल्वे स्टेशनला एक्सप्रेस रेल्वेचे थांबे मिळवण्यासाठी सहकार्य करावे. यासाठी मानवतकरांसह, मानवत व्यापारी महासंघ व महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघाच्या वतीने पाथरी विधान सभा मतदार संघाचे आमदार राजेश दादा विटेकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी विचार व्यक्त करताना त्याांनी



सांगितले. दिनांक २६ डिसेंबर रोजी आमदार राजेश दादा विटेकर हे येथील श्री गजानन महाराज मंदिर संस्थानच्या वतीने ५ जानेवारी २५ रोजी १३ ते १५ हजार श्री गजानन महाराज भक्तांच्या अमृतमय वाणीने श्री गजानन महाराज विजयी ग्रंथाचे सामूहिक पारायणाचे आयोजन करण्यात आले. हा सोहळा यशस्वी होण्यासाठी महामंडलेश्वर स्वामी मनीषनंदजी महाराज, मध्य प्रदेश येथील खचरौध रामस्नेही संप्रदायाचे संत तोतारामजी महाराज. ह.भ.प.भारतीताई.व आमदार राजेश दादा विटेकर, मानवत नगरीचे भाग्यविधाते डॉ. अंकुशराव लाड, मानवत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पंकज जाधव आंबेगावकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जुगलसेठ काबरा, मानवत व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे पाटील , सुरेशसेठ काबरा, कृष्णासा बाकळे, भारतीय जनता पार्टी रेल्वे प्रवासी प्रकोष्ठ मानवतरोड रेल्वे स्टेशन प्रमुख डॉ. विजयजी तोष्णीवाल, उपप्रमुख प्रकाशसेठ करपे, व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष संजयसेठ लड्डा, तसेच महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघ जिल्हा कार्यकारिणीचे मार्गदर्शक,व भारतीय जनता पार्टी रेल्वे प्रवासी प्रकोष्ठ. महाराष्ट्र, परभणी जिल्हा कार्यकारणीचे सहसंयोजक के.डी.वर्मा.व इतर व्यापारांच्या साक्षीने आ. राजेश विटेकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी आमदार राजेश दादा विटेकर यांना दिलेल्या निवेदनात. सन २०१६ मध्ये मानवत रोड ते परळी या रेल्वे मार्गाला मंजुरी मिळाली सर्वे झाले परंतु राज्य सरकारची मान्यता नसल्याने या रेल्वे मार्गाला राज्य सरकारची मान्यता मिळवून तसा प्रस्ताव रेल्वे बोर्ड अध्यक्ष यांच्याकडे पाठवण्यासाठी सहकार्य करावे.

मानवत रोड रेल्वे स्टेशन येथे व्यापारी, महाविद्यालयीन विद्यार्थी, कर्मचारी ,व साई भक्तांना पाथरी येथील साईबाबा जन्मभूमीचा दर्शनाचा लाभ व्हावा या हेतूने. मानवत रोड रेल्वे स्टेशनला सचखंड एक्सप्रेस, नांदेड-पुणे एक्सप्रेस. नरसापुर - नगरसोल एक्सप्रेस मुंबईहून येणारी नंदिग्राम एक्सप्रेस हिंगोली मुंबई जनशताब्दी एक्सप्रेस सिकंदराबाद -मनमाड अजिंठा एक्सप्रेस या रेल्वे एक्सप्रेस चा थांबा मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे अशा प्रकारचे निवेदन यावेळी आमदार राजेश दादा विटेकर यांना देण्यात आले.

## अग्रलेख...

# ऑस्ट्रेलियाचे लक्षवेधी पाऊल

ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांपर्यंतच्या मुलांवर समाजमाध्यमाच्या वापरावर बंदी घालणारे विधेयक मंजूर करण्यात आल्याच्या लक्षवेधी घटनेचे पडसाद जगभर उमटू लागले आहेत. तिथे सिनेटच्या मंजुरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होणार आहे. हे जगात प्रथमच घडत असून या कायद्यामुळे ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांच्या आतील मुले-मुली इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि तत्सम सर्व प्रकारच्या समाजमाध्यम प्लॅटफॉर्म्सचा वापर करू शकणार नाहीत. मुख्य म्हणजे हे विधेयक सोशल मीडिया कंपन्यांना वयोमर्यादा लागू करण्यासाठी जबाबदार धरणार आहे. वर उल्लेख केलेला वयोगट आपल्या माध्यमांचा वापर करीत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी या कंपन्यांवर असेल. हा एक क्रांतिकारी निर्णय ठरल्यास आश्चर्य वाटणार नाही. आजच्या डिजिटल जगात मुले लहान वयातच इंटरनेट वापरायला लागली आहेत. युनायटेड नेशन्सच्या आकडेवारीनुसार, जगातील प्रत्येक अर्ध्या सेकंदाला एक मूल पहिल्यांदा ऑनलाईन जगात प्रवेश करते. स्वाभाविकच दिवसागणिक समाजमाध्यम वापरकर्त्या मुलांचे प्रमाण किती मोठे आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ही एक प्रकारची क्रांतीच आहे, पण या ऑनलाईन क्रांतीने अनेक गंभीर आव्हानेही समोर आणली आहेत. न कळत्या वयापासूनच समाजमाध्यमाच्या गर्तेत अडकल्यामुळे त्याच्या वापराने व्यसनाधीनतेपर्यंत पोहोचल्यावर केवळ मानसिक आरोग्यच नाही, तर शारीरिक समस्याही उद्‌भवू शकतात, असा इशारा जगभरातील तज्ज्ञ देत आहेत. यामुळेच जगभरात समाजमाध्यम कंपन्यांच्या जबाबदाऱ्या वाढविण्याची मागणी जोर धरू लागली आहे, जी योग्य आहे. अनेक देश विशेषतः मुलांच्या ऑनलाईन सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करून नवीन कायदे करीत आहेत. आता ऑस्ट्रेलियाने या दिशेने पाऊल टाकले असले, तरी यामुळे त्यांच्यावर एकीकडे कौतुक तर दुसरीकडे टीकाही होत आहे. सदर विधेयक संसदेत प्रचंड बहुमताने मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने १०३ तर विरोधात केवळ १३ मते पडली. या विधेयकानुसार, पालकांची संमती किंवा आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या सोशल मीडिया खात्यांसाठी कोणतीही सूट दिली जाणार नाही. यातील मोठी बाब म्हणजे या प्लॅटफॉर्मपासून मुलांना दूर ठेवण्यासाठी समाजमाध्यम प्लॅटफॉर्मलाच व्यवस्था करावी लागणार आहे. कायदा लागू झाल्यानंतर, बंदी कशी लागू करायची हे ठरवण्यासाठी प्लॅटफॉर्मकडे एक वर्ष असेल. या कालावधीमध्ये ते तसे करू न शकल्यास मोठा दंड भरावा लागेल. तो साधारणपणे ३२.५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच २७० कोटी रुपयांचा असेल. सरकारने युक्तिवाद करताना काही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले असून त्यांच्यानुसार ऑस्ट्रेलियन तरुणांसाठी समाजमाध्यम हे हानिकारक ठरू शकते. आजमितीला १४ ते १७ वयोगटातील सुमारे ६६ टक्के ऑस्ट्रेलियन मुलांनी अतिशय हानिकारक ऑनलाईन सामग्री पाहिली असून यामध्ये औषधांचा चुकीचा वापर, आत्महत्या किंवा स्वत:ला हानी पोहोचवून घेणाऱ्या घातक मजकुराचा समावेश आहे. हे लक्षात घेऊन ऑस्ट्रेलियन सरकारने यावर्षी समाजमाध्यमाचा वापर करण्यास योग्य अशी वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाची चाचणी सुरू केली. आपल्या मुलांवर होणाऱ्या समाजमाध्यमाच्या परिणामाची काळजी असणाऱ्या पालकांसाठी हे करणे गरजेचे असल्याचे सांगत सरकारने आपल्या निर्णयाचे समर्थन केले आहे. यावेळी ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी आपण अनेक पालकांशी बोललो असल्याचे स्पष्ट केले. या चर्चेतून अनेक पालक मुलांच्या ऑनलाईन सुरक्षिततेबद्दल चिंतित असल्याचे दिसून आल्याचे मत त्यांनी माध्यमांपुढे मांडले. अर्थातच टेक कंपन्यांनी या विधेयकाला विरोध केला आहे. खरे पाहता विधेयक मंजूर होण्यापूर्वीच त्याला तीव्र विरोध सुरू झाला होता. १०० हून अधिक ऑस्ट्रेलियन आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी एक खुले पत्र लिहून आपली नाराजी आणि नापसंती सरकारपुढे मांडली होती. या पत्राद्वारे सरकारने ठरवलेली वयोमर्यादा खूप कठोर असल्याचे नमूद केले होते. या महत्त्वपूर्ण विधेयकासंदर्भात टेक कंपन्यांचे म्हणणे आहे की, वयोमर्यादा निश्चित करण्याबाबतच्या संशोधनाचे निकाल समोर येईपर्यंत सरकारने हे विधेयक मंजूर करू नये. त्यांचा असा युक्तिवाद आहे की, निकाल समोर आला नसताना उद्योग किंवा ऑस्ट्रेलियन लोक या विधेयकासाठी आवश्यक असलेले वय किंवा अशा उपाययोजनांचा परिणाम समजू शकणार नाहीत. तरुणांच्या मानसिक आरोग्यासाठी काम करणाऱ्या 'रीचआऊट' या संस्थेने या कायद्याला आक्षेप घेतला आहे. संस्थेच्या म्हणण्याप्रमाणे ७३ टक्के तरुण मानसिक आरोग्याचे जतन करण्यासाठी समाजमाध्यमाची मदत घेतात. असे असताना घालण्यात येणाऱ्या बंदीमुळे या सुविधेमध्ये बाधा येऊ शकते. एवढेच नाही, तर अम्नेस्टी इंटरनॅशनल आणि ऑस्ट्रेलियाच्या मानवाधिकार आयुक्त लॉरेन फिनले यांनीही या विधेयकावर टीका केली आहे. एकीकडे असे असताना जगातील इतर देश यासंदर्भात काय करत आहेत, याचीही माहिती घ्यायला हवी. अमेरिकेने २६ वर्षांपूर्वीच मुलांच्या ऑनलाईन सुरक्षेसाठी कायदा केला आहे. या कायद्याचे नाव 'चिल्ड्रेन ऑनलाईन प्रायव्हसी प्रोटेक्शन ॲक्ट' असे असून या अंतर्गत १३ वर्षांखालील मुलांची माहिती गोळा करण्यापूर्वी वेबसाईट्सना पालकांची परवानगी घ्यावी लागेल, असा नियम आहे. २००० मध्ये चिल्ड्रेन्स इंटरनेट प्रोटेक्शन ॲक्ट अंतर्गत अनावश्यक सामग्रीपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी शाळा आणि ग्रंथालयांना इंटरनेट फिल्टर स्थापित करणे अनिवार्य करण्यात आले. तथापि, मुलांच्या वयाबाबत फसवणुकीची शक्यता, तसेच या प्रकारच्या कृत्याला प्रोत्साहन देणारा ठरवून या कायद्यांवर टीका केली जाते. ऑस्ट्रेलियाच्या पावलावर पाऊल ठेवत ब्रिटिश सरकारही १६ वर्षांखालील मुलांसाठी समाजमाध्यमावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. ब्रिटनचे टेक्नॉलॉजी सेक्रेटरी पीटर काईल यांनी सांगितल्याप्रमाणे ऑनलाईन सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, विशेषतः मुलांसाठी जे काही लागेल ते ते केले जाण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या देशातही अशा प्रकारचा कायदा लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फ्रान्सने १५ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी शाळांमध्ये मोबाईल फोनवर बंदी घालण्याची चाचणी सुरू केली आहे. ही चाचणी यशस्वी झाल्यास संपूर्ण देशात लागू केली जाऊ शकते. इतकेच नाही, तर फ्रान्समध्ये १५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले पालकांच्या परवानगीशिवाय समाजमाध्यमाचा वापर करू शकत नाही, असाही कायदा आहे. त्याच वेळी नॉर्वेसारख्या युरोपीय देशाने समाजमाध्यमाचा वापर करण्याची वयोमर्यादा १३ वरून १५ वर्षे करण्याची घोषणा नुकतीच केली आहे. हे सगळे बघता भारतासारखा सोशल मीडियाचा प्रचंड वापर करणारा देश नेमकी कोणती भूमिका घेतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आहेच; खेरीज तरुणांची सर्वाधिक संख्या असणाराही देश आहे. आपल्याकडे अगदी लहान वयापासून मुलांच्या हातात फोन दिला जातो आणि ते समाजमाध्यमावर सक्रिय होतात. महत्त्वाचे म्हणजे जगभरातील सर्वात स्वस्त इंटरनेट सेवा मिळत असल्यामुळे प्रत्येक वर्गातील मुले याचा बिनधोक वापर करताना दिसतात. स्वाभाविकच नकळत्या, कोवळ्या आणि अजाण वयात समाजमाध्यमाच्या जंजाळात अडकून, चुकीची माहिती मिळवून गैरवापर करणाऱ्यांची मोठी संख्या आणि या योगे घडलेले भीषण गुन्हे दररोज चर्चेत असतात. मुलांना ज्ञानाची गरज असते, यात शंका नाही. मात्र समाजमाध्यमावरून ही गरज भागवणारे ज्ञान मिळते की मुले चुकीच्या आणि अनावश्यक माहितीच्या महापुरात वाहवली जातात, हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे भारत सरकारही या प्रश्नाचा साकल्याने अभ्यास करून आवश्यक ती पावले उचलेल, अशी आशा वाटते.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१०)

प्राचार्य प्र. श्री. डोरले

व्यास महर्षींनी लिहिलेला महाभारत हा ग्रंथ सर्व बाबतीत विलक्षण असा आहे. वर वर विचार करणाऱ्या आणि उथळ बुद्धीच्या माणसाला हा ग्रंथ म्हणजे कौरव आणि पांडव यांच्यातील गृहकलह किंवा धृतराष्ट्र आणि युधिष्ठिर या काका-पुतण्यांमधील वारसा हक्कासंबंधात झालेला विवाद, जो इतका विकोपाला गेला की, त्याचा सुप्रीम निवाडा कुरुक्षेत्रावर झालेल्या रक्तपातातूनच लिहावा लागला असे वाटते. या संदर्भात व्यासांनी हाच स्पष्ट संदेश दिला आहे की भरताच्या वंशजांनो! वारसदारांनो! लक्षात ठेवा! कोणत्याही धृतराष्ट्री मनोवृत्तीचा ज्याचा उल्लेख आपण या आधीच्या लेखांमध्ये 'पाकिस्तानी' वृत्ती म्हणून केला आहे, अंत हा कोणत्याही युगातील कुरुक्षेत्रावर म्हणजे युद्धभूमीवरच होत असतो. कारण कोणत्याही युगातील 'फाळणी'चा तो अपरिहार्य असा परिणाम असतो. तो तुमच्या सात्त्विक, पापभिरू, सज्जन, मानवतावादी, सर्वधर्म समान, प्रत्येकात परमेश्वराचा अंश आहे या तथाकथित दैवीगुणसंपदेने कधीही टळत नसतो किंवा टाळल्याही जात नसतो. कारण तुमची इच्छा असो वा नसो, तुमच्या 'अहिंसामयं' धर्माला ते मान्य असो वा नसो, तुमच्या सर्व संपत्तीचे, भूमीचे, स्त्रियांचे, बळजबरीने हरण करून भूतलावरील तुमचे अस्तित्वच नष्ट करण्याचा चंग जर आम्ही बांधला आहे, निश्चयच जर आम्ही केला आहे, तर तुम्हाला काय वाटते? जग काय म्हणेल? याचा विचार करण्याची आम्हाला गरजच काय? आम्ही सरळ झरळ तुमच्या विरुद्ध, तुमच्या धर्माच्या विरुद्ध 'जिहाद' पुकारणार. तुमची इच्छा असली तरी नसली तरी, तुम्ही श्रेष्ठ आर्यांचे 'वारसदार' असाल, समुद्र वलयांकित संपूर्ण पृथ्वीवर राज्य करणाऱ्या भरताचे रक्त जर तुमच्या धमन्यांमधून वाहत असेल तर या - आमच्याशी दोन हात करा, नाहीतर भरा! असा सरळ सरळ त्यांचा काफरांशी म्हणजे त्यांच्या शत्रूशी वागण्याचा त्यांच्या ऐतिहासिक वाटचालीचा इतिहास आहे. त्याच्याशी ते एकविसाव्या शतकातही ते तितकेच प्रामाणिक आहे जितके त्यांच्या आक्रमणाच्या प्रारंभ काळात होते. प्रश्न आमचा आहे. आमचे सुदैव इतकेच आहे की, भरतवंशीयांना, त्यांच्या धर्म, संस्कृतीला सावरण्यासाठी वेळो वेळी एखादी सुयोग्य नेतृत्व करणारी व्यक्ती उदयाला येते, बिघडलेला तोल सांभाळते, घसरणीला लागलेली गाडी सांवरते, तिला नीट रुळावर आणते आमचा जीवन प्रवास हा सुरळीतपणे चालू होतो. पण या जीवनप्रवासातील अनेक खाच-खळगे अपघातग्रस्त स्थळे अद्याप लक्षात घ्यायला आम्ही तयार नाही. इतिहासापासून आम्ही काही शिकलो नाही. शिकायला तयार नाही.

बांगलादेशातील जिहादी सत्ता परिवर्तन हे त्याचे ताजे उदाहरण आहे. त्यावेळी जगाने स्तिमित व्हावे या प्रकारचा पराक्रम आपल्या सेनेने केला. त्र्याण्णव हजार पाकिस्तानची सेना 'दाती तृण धरून' शरण आली. त्यावेळी 'व्याप्त काश्मीर परत द्या आणि आपली सेना परत न्या', असा जेत्याला साजेसा व्यवहार आम्ही केला नाही. कारण शत्रूशी कसा व्यवहार करावा हे आम्ही शिकलोच नाही. महाभारतकार म्हणतात, हे राजन् प्रजापालन, शत्रूचा संहार आणि राज्यातील स्त्रियांचे संरक्षण हे तुझे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी तू साम-दाम-दंड यांचा निग्रहपूर्वक वापर कर. ज्याच्या राज्यात दुष्टांना, स्वार्थी लोकांना, राज्याच्या धनाचा अपहार करणाऱ्यांना संरक्षण मिळते ते राज्य लवकरच विनाश पावते. जो राजा, आपल्या राष्ट्रातील दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांचा विनाश करीत नाही, छुपेपणाने शत्रूला मदत करणाऱ्या (आजच्या परिभाषेत 'स्लिपर सेल') राष्ट्रद्रोही लोकांचा समूळ नायनाट करीत नाही, त्याचे राज्य हे केव्हाही नष्ट होऊ शकते. हे राजन! लक्षात घे- राष्ट्रावर येणारी संकटे ही बाह्य आणि आभ्यंतर अशी दोन प्रकारची असतात. बाह्य संकटांचा परिहार हा सैन्य शक्तीने होतो तर अंतर्गत संकटांचा नाश जागृत जनशक्तीने होत असतो. गरुडाच्या पंखाप्रमाणे ज्याची ही दोन्ही पंख मजबूत आहेत त्याचेच राज्य चिरंतन होते.(शिवरायांचा आठवावा प्रताप). जो राज्याधिपती शत्रूशी शत्रूप्रमाणेच वागतो आणि मित्राशी मित्राप्रमाणे वागतो त्याचा पराभव कधीही होत नाही. कारणे- यास्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तस्मिन्स्तथा वर्तितव्य धर्म:। मायाचारो मायया वर्तितव्यः साध्वचारः साधूना प्रत्युपेयः ॥ (विदुरनीति अ.३७वा ) म्हणजे 'ज्याच्याशी जो मनुष्य जसा वागतो त्याने त्याच्याशी तसेच वागावे हा धर्म आहे. कपटाने वागणाऱ्याशी कपटाने वागावे आणि भलेपणाने वागणाराशी भलेपणाने वागावे हा धर्म आहे.'

महाभारताच्या या सैद्धांतिक आणि वैचारिक कसोटीवर भारतीय 'जनशक्तीतील' प्रत्येक घटकाने आपले कठोर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आज आली आहे. भारतासारख्या सध्याच्या काळात जागतिक स्तरावर 'समर्थ भारत' म्हणून वाटचाल प्रारंभ करणारा देश 'अंतर्गत अराजकाच्या उंबरठ्यावर' हळूहळू येत आहे. 'निवडणुकीमधील 'होट बँके'च्या, लोकशाहीतील एक अचूक अस्त्रामुळे, आपण जे ठरवू ते घडवू शकतो याचा एक विपरीत आणि विकृत दर्प आणि अहंकार त्यांचा जागृत होऊन 'शासनापासून, मंदिर-मशिदीच्या प्रकरणातून मुस्लिम विद्यापीठातून, जमाते इस्लामीच्या निघणाऱ्या फतव्यांपासून हिंदू समाजाचा तेजोभंग करण्याचा, त्यांच्यात मानसिक भयगंड निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. हे आव्हान हिंदू समाजाला स्वीकारावेच लागेल. त्यांतून त्याची सुटका नाहीच.

सोळाव्या शतकात हे आव्हान महाराष्ट्रातील जनशक्तीने स्वीकारले आणि भारताचे 'दारुल इस्लाम' (आजच्या भाषेत 'गजवा-ए-हिंद) करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या औरंगजेबाला खुलताबाद येथे चिर विश्रांती दिली. छत्रपती संभाजी महाराजांच्या आत्म्याला शांती मिळाली. 'म्लेंच्छांचे बहुता दिसांचे माजलेले बंड नाहीसे होऊन हिंदुस्तान बळावले'- हेच स्वप्न राष्ट्रगुरू श्री समर्थांनी पाहिले होते. -स्वप्न कुणाचे पूर्ण होणार? सज्जनगडावरील समाधिस्त झालेल्या श्रीसमर्थांचे? की कबरीत विश्रांती घेणाऱ्या औरंजेबाचे?

निर्णय हिंदू समाजाला घ्यायचा आहे.

९८६०२९६१३१
(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)


## वेध

संजय रामगिरवार

# 'सराय'च्या जगण्याची आशा पल्लवित?

चंद्रपुरातील ऐतिहासिक महत्त्व असलेली जुनी 'सराय' जवळजवळ जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर आहे. येणाऱ्या पावसाळ्यात राहील का, अशी शंका यावी एवढी जर्जर स्थिती या १०० वर्ष ओलांडलेल्या वास्तूची झाली आहे. डागडुजी करून ती जपली जावी म्हणून काही नागरिकांचा लढा सुरू आहे. या इमारतीला संरक्षित स्मारक घोषित करणार का? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पुरातत्व विभागाच्या संचालकांना विचारला आहे. येत्या १५ जानेवारीपर्यंत त्यांना याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करायचे आहे. न्यायालयाच्या हस्तक्षेपाने आता 'सराय'च्या जगण्याची आशा पल्लवित झाली, असे म्हणता येईल. मात्र, विदर्भात अशा अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत, ज्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे आणि त्या शेवटच्या घटका मोजत आहेत.

तत्कालीन चांद्यात १९२१ मध्ये बांधण्यात आलेल्या 'ओल्ड सराय बिल्डिंग'ला तिच्या आठवणींसह जिवंत ठेवण्यासाठी काही वर्षांपूर्वी नागरिकांनी आंदोलन उभारले. उपोषणाचा इशाराही देऊन झाला. पण कुणालाच शहराच्या मध्यभागी असलेल्या या ऐतिहासिक वारशाकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. शेवटी तिचे संरक्षण व्हावे यासाठी इतिहासाचे अभ्यासक अशोकसिंग ठाकूर व मधुसूदन रुंगठा यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी सुरू आहे. या इमारतीच्या संवर्धनाबाबत संबंधित विभागांत मतभिन्नता आहे. राज्याच्या पर्यटन विकास विभागाने 'सराय'चा 'हेरिटेज'मध्ये समावेश होऊ शकत नाही, असे सांगितले. तर राज्य हेरिटेज प्राधिकरणाने तिचे संवर्धन होऊ शकते, असे मत व्यक्त केले आहे. चंद्रपूर महानगरपालिका तर या इमारतीला जमीनदोस्त करून त्या ठिकाणी वाणिज्यिक कॉम्प्लेक्स उभारण्याची योजना आखून आहे. पुरातत्व विभागाचे काय मत आहे, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



असे म्हटले जाते, इतिहास विसरून भविष्याकडे केलेली वाटचाल मोठी अवघड असते. कुठल्याही शहरात एकतरी अशी वास्तू असते जी आपल्या भूतकाळाची आठवण करून देते. बहुतांश, तो त्या नगराचा गौरवशाली इतिहास असतो. गावातले चार-दोन लोक अशा वास्तूच्या जतनासाठी शासन व प्रशासनाशी गेली अनेक वर्ष भांडताहेत. पण त्यांना 'क्यूं गडे मुडदे उखाडते हो', असे काहीसे ऐकावे लागते. असाच एक संघर्ष चंद्रपुरात गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. 'सराय' नावाच्या या वास्तूने एकेकाळी कमालीचे वैभव बघितले, पण आता ती स्वत:ला कसेबसे उभे ठेवण्याचा संघर्ष अनुभवत आहे. काही वर्षापूर्वी या वास्तूच्या जतनासाठी पत्रव्यवहार, गाठीभेटी झाल्या. विविध पक्षांतील नेतेमंडळींनीही प्रसिद्धीपत्रक काढून आपल्याला या पुरातन वास्तूबद्दल किती चिंता आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला. आश्वासनांची जोरदार बरसात झाली. पण त्या पावसात या इमारतीचे छत कोसळले. शेवटी न्यायालयात जनहित याचिका दाखल करावी लागली.

'सराय'च्या जतनाची कहाणी केवळ प्रातिनिधिक स्वरुपाची आहे. अशा अनेक वास्तू विदर्भात कुठल्यातरी जनहित याचिकेची वाट पाहात आहेत. कारण त्या शहरांतून अशा वास्तूंच्या जतनाचे सारे प्रयत्न गळून पडले असतील. वैनगंगेच्या काठावर वसलेल्या आणि विदर्भाची काशी म्हणून ओळल्या जाणाऱ्या आठव्या शतकातील 'मार्कंडा' मंदिराच्या जतनासाठीही खूप प्रयत्न करावे लागले. अजूनही तिकडे मोठ्या विकासाची अपेक्षा शिल्लक आहे. याच जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातले भोवरागड किल्ला, चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूरचा गोंडकालीन किल्ला, नागपूर जिल्ह्यातील भिवापूरची पुरातन पायविहीर, भंडारा जिल्ह्यातील कैसर ए हिंद दरवाजा, ऐतिहासिक पांडे महाल, गिरजा पार्वती गुंफा, यवतमाळ जिल्ह्यातील ढाकणीचा बारव, लाडखेड येथील दक्षेश्वर मंदिर, रंगनाथ स्वामी मंदिर, बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीची गढी, चिंचखेड येथील शिव मंदिर, चिंचपूर-खामगावचे दोन पुरातन बारव, अकोला जिल्ह्यातील बाळापूरचा किल्ला, सांगोळा येथील दशानन रावण मूर्ती, मनसरचे स्तूप आणि चैत्यगृह, गोंदिया जिल्ह्यातील कामठा किल्ला अशी विदर्भातील कितीतरी ठिकाणे आहेत, जी जपली गेली पाहिजे. पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे. पुरातत्व विभागाच्या कायद्याने त्याकडे कुणाला बघता येत नाही आणि ज्यांनी बघावे ते ढुंकूनही पाहण्याच्या मानसिकतेत नाही!

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

# दमदार बॅटिंगचा पहिला महिना

मोरेश्वर बडगे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील तीन पक्षांच्या महायुती सरकारला एक महिना पूर्ण झाला. २३ नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीचे निकाल लागले. पाच डिसेंबरला मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या दोघांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र मंत्रिमंडळाचा विस्तार व्हायला १५ डिसेंबर उजाडला. खातेवाटपासाठी आणखी सात दिवस म्हणजे २१ डिसेंबरपर्यंत थांबावे लागले. बिनखात्याच्या सरकारने नागपूर अधिवेशन झेलले. जिल्ह्याचे पालकमंत्री वाटायचे आहेत. त्यासाठीही प्रचंड चढाओढ आहे. म्हणायला ४२ मंत्री. जगन्नाथाचा हा रथ सर्वांना सोबत घेऊन फडणवीस मार्ग काढताना दिसत आहेत. निकालानंतर तब्बल एक महिन्याने फडणवीस सरकार कामाला लागले. 'महाराष्ट्र थांबणार नाही' असे सांगणारे सरकार प्रचंड बहुमत असताना असे अडखळत का चालतेय? असा प्रश्न जनतेला पडणे स्वाभाविक आहे. विधानसभेच्या एकूण २८८ आमदारांपैकी २३७ आमदार सत्तेच्या पाठीशी आहेत. एकट्या भाजपाचे १३२ आमदार आहेत. बहुमतासाठी १४५ आमदार लागतात. त्यामुळे सरकारला कुठला धोका नाही. 'डबल फेव्हिकॉल'चं हे सरकार म्हणता येईल. 'ही 'टेस्ट मॅच' आम्ही चांगली खेळू' असे फडणवीस यांनी म्हटले आहे. 'राजकारणात ज्या विचारांनी आलो त्यात सत्ता हे सेवेचे माध्यम असल्याचं आम्हाला शिकवलंय. त्यामुळे सत्ता माझ्या डोक्यात जाणार नाही' असे आश्वासक उद्‌गार फडणवीस यांनी नागपुरात मीडियाशी बोलताना काढले. जनतेला तसा विश्वास आहे. हा विश्वास सार्थकी लागेल याची काळजी सत्ताधाऱ्यांना घ्यायची आहे.

फडणवीसांची पहिली टर्म महाराष्ट्राने पाहिली आहे. आता लोकांना 'देवराज्य' पाहायचे आहे. देवेंद्र हे सरकार कसे चालवतात, खिरापती वाटतात की रिझल्ट देतात याची त्यांच्या चाहत्यांना उत्सुकता आहे. २०१४ ते २०१९ अशी सलग पाच वर्षे फडणवीसांनी सरकार चालवून दाखवले. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री होते. मात्र त्यांनाही सलग पाच वर्षे राज्य करता आले नाही. मंत्रिपदाचा कुठलाही अनुभव नसताना फडणवीसांनी हा विक्रम केला. मात्र तेव्हाची गोष्ट आणि आताचा काळ यात फरक आहे. तेव्हा शिवसेनेसोबत युती होती. आता एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस मिळून तीन पक्षांचे सरकार आहे. विरोधी पक्ष दुबळा आहे. फडणवीस यांच्यापुढे बाहेरून फारसे कुठले आव्हान नाही. मात्र मित्रपक्षांना त्यांना 'सांभाळावे' लागेल असे दिसते. नाराजीमध्ये एकनाथ शिंदेंना गावाला जायची सवय आहे. गेल्या महिन्यात आपण ते पाहिले. अजितदादाही अधूनमधून 'नॉट रिचेबल' होतात. मित्रपक्षांना सांभाळताना फडणवीसांची कसरत होणार आहे. अजितदादांनी ओबीसी नेता छगन भुजबळ यांना यावेळी वगळले. संतप्त भुजबळांना फडणवीस कसे 'सांभाळतात' ते आता पाहायचे. विरोधकांनी बीड जिल्ह्यातील सरपंचाच्या हत्येचे प्रकरण लावून धरले आहे. अजितदादांच्या जवळचे सहकारी मंत्री धनंजय मुंडे यांना टार्गेट केले जात आहे. हा नाजूक विषय हाताळताना गृहमंत्री या नात्याने फडणवीसांचा कस लागणार आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मनोज जरांगे पाटील यांनी गेली दोन वर्षे फडणवीसांना टार्गेट केले होते. जरांगे पाटलांनी पुन्हा आंदोलनाची तयारी चालवली आहे. यावेळी पूर्वीसारखा जोर नसेल. मात्र काड्या होतील. पुढच्या चार-सहा महिन्यांत महापालिका, जिल्हा परिषद यांच्या निवडणुका लागणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका महायुती म्हणून लढल्या जातात की तिन्ही पक्ष स्वबळावर लढतात त्यावर मित्रपक्षांचा पुढचा प्रवास अवलंबून असेल. २०२९ च्या निवडणुका भाजपा स्वबळावर लढेल असे अमित शाह यांनी मागेच जाहीर केले आहे. त्यामुळे पाच वर्षांनंतर आपले भवितव्य काय? याची चिंता आतापासूनच मित्रपक्षांना सतवायला लागली असणार. तुम्ही लिहून ठेवा. २०२९ मध्ये प्रादेशिक पक्ष संपलेले असतील. भाजपा आणि काँग्रेस हेच दोन मोठे पक्ष असतील. राजकीय आघाडी सांभाळताना फडणवीसांना आर्थिक शिस्तही बिघडणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. 'लाडकी बहीण'सारख्या योजनेने महायुतीला सत्ता दिली. मात्र असल्या लोकप्रिय योजनांचे आर्थिक ओझे भविष्यात वादाचा विषय होऊ शकतो. सत्तेत आलो तर शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन भाजपाने दिले होते. ते पाळायचे तर तेही ओझे मोठे असेल. एकंदरीत साऱ्याच आघाडीवर सरकारची कसरत आहे.

महायुतीचे सरकार म्हणजे नवा प्रयोग आहे. या वेळचे सरकार एकदम ताजेतवाने आहे. ४२ जणांच्या मंत्रिमंडळात तब्बल १९ नवे चेहरे आहेत. त्यात ८ नवे चार भाजपाचे, शिंदे सेनेचे ६, तर अजितदादांच्या पक्षाचे ५ नवे चेहरे आहेत. हे ऑपरेशन करताना हायकमांडने अनेकांना नारळ दिला. बहुतेकांनी हे वास्तव स्वीकारले. मात्र ७७ वर्षांचे दादांच्या पक्षातले ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी आपली नाराजी इश्यू बनवली आहे. ओबीसींच्या अस्मितेचा विषय बनवला आहे. अजितदादा आणि छगन भुजबळ यांच्यातली कटुता जुनी आहे. त्यामुळे भुजबळ पुढे काय करतील? कुठे जातील याची जोरदार चर्चा आहे. भुजबळ अजितदादांना भेटले नाहीत. मात्र फडणवीसांना भेटले. मात्र एक लिहून ठेवा. भाजपा त्यांना जवळ करणार नाही. कारण तसे केले तर महायुतीतच नवे ताणतणाव निर्माण होतील. भाजपाला ते परवडणारे नाही. भुजबळ उद्धव ठाकरेंकडेही जाऊ शकत नाहीत. कारण ठाकरेंनी अलिकडे हिंदुत्वाचा मुद्दा उचलून धरणे सुरू केले आहे. महात्मा फुलेंचा वारसा सांगणारे भुजबळ आणि त्यांच्या समता परिषदेच्या विचारधारेत आता उद्धव बसत नाहीत. भुजबळांसाठी काँग्रेस पक्ष ही चांगली जागा ठरू शकते. या वयात भुजबळ आपली जागा कुठे शोधतात, त्याची नक्कीच उत्सुकता आहे.

सारेच विरोधी पक्ष आणि त्यांच्या नेत्यांची अवस्था भुजबळांसारखी दयनीय आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांना जमिनीवर आणून ठेवले आहे. पुढची साडे चार वर्षे आता निवडणुका नाहीत. महायुतीचे सरकार एकदम 'भूकंपप्रूफ' आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेच नव्हे तर शरद पवारांपुढेही आपला उरलासुरला पक्ष टिकवण्याचे मोठे आव्हान आहे. शरद पवार फिरत असले तरी मनाने थकले असणार. उद्धव ठाकरे यांची 'मशाल' पेटायला तयार नाही. काँग्रेस राष्ट्रीय पक्ष आहे. मात्र त्याच्याकडे दमदार नेते नाहीत. ठाकरे सेनेकडे तर मतदारसंघापुरतेही नेते उरले नाहीत. मुंबईची महापालिका गेली २५ वर्षे उद्धव यांच्या शिवसेनेकडे राहिली. मुंबई महापालिका म्हणजे ठाकरे यांचा ऑक्सिजन. आज ही महापालिकाच हातातून जाण्याची भीती उद्धव यांना सतावत आहे. गप्पा मात्र स्वबळाच्या सुरू आहेत. पण स्वबळ उरले आहे कुठे? मुख्यमंत्री व्हायच्या लोभाने उद्धव हे शरद पवारांसोबत गेले. सत्तेच्या धुंदीत दिल्लीला धडक द्यायला निघाले होते. पण काय मिळाले? अडीच वर्षांत मुख्यमंत्रिपद गेले, पक्षही गेला. आता मुंबईही हातची जाणार आहे. मराठी अस्मितेला दगा देणाऱ्या सत्तेच्या लोभी नेत्याचे हेच हाल होणार. 'सेक्युलर' व्हायला निघालेल्या उद्धव यांच्यावर आता मारुती मंदिरासाठी आरती करायची वेळ आली आहे. विधानसभा निवडणुकीने उद्धव ठाकरेच नव्हे तर शरद पवार यांचेही राजकारण संपवले. हिंदुत्वाशी गद्दारी केल्याची ही शिक्षा. 'एक अकेला देवेंद्र' काय करू शकतो याची ही झलक आहे.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## लोणार सरोवराचा ठेवा जपला पाहिजे

लोणार सरोवर हे वैज्ञानिकासाठी मोठे आकर्षण आहे. हा एक जागतिक ठेवा आहे. अलिकडे या सरोवराच्या पूर्वेकडील बाजूस मोठ्या प्रमाणावर भूस्खलन झाले आहे असे वर्तमानपत्रातील बातम्यांवरून कळते. या भागातून शेगाव ते पंढरपूर हा मार्ग जात आहे. तेथील अवजड वाहनाच्या गतीमुळे तसेच त्या भागात मोठ्या प्रमाणावर झालेल्या वृक्षतोडीमुळे कडा ढासळला आहे. वरची माती पाण्याने भरलेली असल्याने ती अस्थिर होऊन खाली सरकते असे खगोल संस्थेचे प्रमुख मयूरेश प्रभुणे यांचे म्हणणे आहे. काठावरून जाणाऱ्या महामार्गावर सतत वाहतूक चालू असते. जड वाहनांच्या कंपनामुळे तसेच एखादा मोठा वृक्ष तोडल्यास तेथील भाग ठिसूळ होतो. जमीन ढासळू लागते असेही मत प्रभुणे यांनी व्यक्त केले आहे. हवामानातील बदल, पर्यावरणातील इतर मानवी प्रभावामुळे होणारे ग्लोबल वार्मिंग तसेच नैसर्गिक घटनांची वारंवारता यामुळे भूस्खलनाची घटना घडत आहे. एकूणच लोणार सरोवर हा एक नैसर्गिक चमत्कारच आहे व तो ठेवा आपण जपला पाहिजे.

**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

●● ●●

## गांधीसागरची भिंत, पार्किंग आणि जाहिरात फलक

गांधीसागर तलावाचे सध्या सौंदर्यीकरण सुरू आहे. चारही बाजूंनी आकर्षक अशी भिंत तयार करण्यात आली आहे. छानसे गेटही तयार आहे. आतमध्ये काय सुरू असेल याचे जनतेत कुतूहल आहे. भिंतीलगतचा भाग आता छान मोकळा झाला आहे. तेथे फूटपाथ ठेवलेला नाही हे योग्यच आहे. कारण फेरीवाले व फुटकळ विक्रेते केव्हा आपले पोते टाकून बसतील याचा नेम नाही. पण हल्ली श्रीमंत व सुशिक्षित नागरिकांनीच काही नियम मोडणे सुरू केले आहे. प्रथम तर जागा मोकळी पाहून आपापली वाहने तेथे उभे करणे सुरू आहे. वेळीच हटकले नाही तर हळूहळू ती जागा कार पार्किंग म्हणून प्रसिद्ध होईल तसेच एका पक्षाच्या राजकीय नेत्याचे भले मोठे दोन पोस्टर्स तेथे भिंतीलाच लावले आहे. ही जर सुरुवात झाली तर विविध राजकीय पक्षाची ती 'प्रसिद्धी भिंत' म्हणून ओळखली जाईल अशी भीती आहे. संबंधित पोलिस विभाग अथवा जबाबदार अधिकारी यांनी वेळीच दखल घ्यावी व त्या भिंतीलगत काहीही अतिक्रमण उभे राहू नये यासाठी कर्तव्यतत्पर असावे असे वाटते.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

## वाचक पत्रे

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा भोंगळ कारभार



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा म्हणजेच एस. टी.चा खूप भोंगळ कारभार अनुभवास आला व एस. टी. म्हणजे 'सतत त्रास' अशीच उपाधी द्यावीशी वाटते. झाले असे की एका मित्राच्या लग्नासाठी खामगावला जायचे होते. थेट रेल्वे नसल्यामुळे व दुपारी १२ वाजेपर्यंत पोहोचायचे असल्यामुळे बसने जायचे ठरवून ऑनलाईन सकाळी ८ वाजताची 'शिवशाही'ची बुकिंग केली. सकाळी आठ वाजता नागपूरहून सुटणारी बस सकाळी ११.३० वाजता खामगावला पोहोचेल असे एस. टी.च्या वेबसाईटवर दाखवण्यात आले. रविवार २२ तारखेला सकाळी ७.३० वाजता गणेशपेठ बसस्थानकावर पोहोचलो, परंतु बसची निर्धारित वेळ झाली तरी बस फलाटावर आली नाही म्हणून विचारपूस करण्यास चौकशी केंद्रावर गेलो व त्याला ऑनलाईन बुकिंग केल्याचे तिकीट दाखवले तर आश्चर्याचा धक्काच बसला. कारण तेथील कर्मचाऱ्याने तिकीट पाहून सांगितले की अशी कोणतीच बस नाही. जेव्हा खामगाव डेपोची बस येईल तेव्हाच कळेल. यावर त्याने तिकीट बघून हे असे ऑनलाईन तिकीट बुक करत जाऊ नका. कारण ती जुनी साईट आहे व टाईम टेबलप्रमाणे अशी कोणतीच बस नाही असे सांगितले. शिवशाही बसचे जास्त भाडे आकारून काढलेले तिकीट असल्याने त्याने सल्ला दिला की, ९ वाजता हिरकणी बस येईल त्याने जा किंवा लाल परीने पण जाऊ शकता. (परंतु भाडे फरक काही परत मिळणार नाही). नंतर ९.३० वाजता बुलढाण्याला जाणारी एक बस आली. चौकशी खिडकीवरील कर्मचारी त्या बसच्या कंडक्टरशी बोलला व आम्हाला त्या बुलढण्याच्या बसमध्ये बसायला सांगितले. आमचा प्रवास एकदाचा १० वाजताच्या सुमारास सुरू झाला. कोंढाळीच्या थोडे आधी कंडक्टरने तिकीट तपासल्यानंतर पुन्हा एक धक्का दिला की, तुम्ही या बसमध्ये कसे चढले, तुम्हाला कोंढाळीला उतरवतो तिथून दुसरी बस पकडा. आम्ही त्याला आठवण करून दिली की नागपूर स्थानकावर चौकशी काउंटरच्या कर्मचाऱ्याबरोबर झालेल्या बोलण्याची, तेव्हा त्याला जाग आली व आमचा पुढील प्रवास सुरू झाला. अशा एस. टी. (सतत त्रास) देणाऱ्या महामंडळाची धास्ती निर्माण करणारी व ऑनलाईन बुकिंगला नकारात्मक प्रतिसाद देणाऱ्या त्यांच्याच कर्मचाऱ्याचे सल्ले ऐकून नको बाबा एस. टी. म्हणायची वेळ आली.

**चैतन्य दारव्हेकर**/९८६००००२९२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# सरपंच देशमुख हत्या प्रकरणामुळे माजलगावात दर्पण दिनाचा कार्यक्रम साध्या पध्दतीने होणार

## आमदार सोळंके पत्रकारांशी साधणार संवाद, माजलगाव पत्रकार संघाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२६ डिसेंबर**

जिल्ह्यामध्ये सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुण हत्या झाली. हे कुटूंब उघड्यावर पडले असुन माजलगाव पत्रकारसंघाच्या वतीने या घटनेचा निषेध करत यावर्षी होणारा दर्पण दिनाचा कार्यक्रम साध्या पध्दतीने शासकीय विश्रामगृह येथे आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून साजरा करण्यात येणार असल्याचा निर्णय माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आला आहे.

येथील शासकीय विश्रामगृहावर पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते ६ जानेवारीला होणारा दर्पण दिनाचा कार्यक्रम प्रतिवर्षाप्रमाणे मोठ्या पध्दतीने व दर्पण पुरस्कारासह विवीध पुरस्कार देउन न करण्याचा निर्णय घेण्यात आला. सामाजिक दायित्व निभावत माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या पुढाकारातुन कायमच समाजातील विवीध घटकांना पुरस्कार देउन गौरविण्यात येत असत परंतु यावर्षी जिल्ह्यामध्ये झालेली सरपंच संतोष देशमुख यांची हत्या या घटनेमुळे अत्यंत साध्या पध्दतीने बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशमुख कुटूंबीयांना माजलगाव तालुका पत्रकार संघ व आ. प्रकाश सोळंके यांच्या पुढाकारातुन विवीध संघटना व समाजातील दानशुर व्यक्तींनी केलेली आर्थिक मदत ४ जानेवारीला मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना देण्यात येणार आहे. ६ जानेवारीचा दर्पण दिनाचा कार्यक्रम हा शासकीय विश्रामगृह याठिकाणी होणार असुन सर्व पत्रकार बांधव व आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत साध्या पध्दतीने होणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान या दरपण दिनाच्या कार्यक्रमांमध्ये आमदार प्रकाश सोळंके पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. या बैठकीस तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, जेष्ठ पत्रकार संतोष मुळी, तुकाराम येवले, दिनकर शिंदे, कमलेश जाब्रस, दत्ता येवले, महेंद्र मस्के, राज गायकवाड यांचेसह पत्रकार उपस्थित होते.


माजलगाव तालुका पत्रकार संघ हा कायम सामाजिक दायित्व निभावत आला असुन माजलगाव धरणामध्ये डॉ. फपाळ यांचा पोहतांना मृत्यु झाल्यानंतर त्यांचा मृतदेह शोधण्यासाठी कोल्हापुर येथील आलेल्या बचाव पथकातील जवान राजशेखर मोरे यांचा दर्दुवी मृत्यु झाला होता. माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या पुढाकारातुन तालुक्यातील विवीध संघटना व दानशुरांनी तब्बल ५६ लक्ष रूपयांची आर्थिक मदत मोरे कुटूंबीयांना कोल्हापुर येथे जावुन देण्यात आली होती तर मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना देखील एक हात मदतीचा असावा म्हणुन आ. प्रकाश सोळंके यांच्या पुढाकारातुन पत्रकार संघाने आर्थिक मदत एकत्रीत केली असुन ४ जानेवारीला ही मदत देण्यात येणार आहे.



बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनांनी कंत्राटदार मिस्त्रींना नियोक्ता परवाने मिळालेच पाहिजे, कामगारांना लाभ वाटपा खोटेपणा करणाऱ्यांवर कारवाई करा यासह विविध मागण्यांसाठी आज शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक धरणे आंदोलन केले. छाया–कृष्णा शिंदे

# पुन्हा कुणाचा संतोष देशमुख होऊ नये यासाठी आजच्या मोर्चात सहभागी व्हा

## आ.संदीप क्षीरसागरांचे जिल्हावासियांना आवाहन




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ डिसेंबर**

दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांची हत्या होऊन तब्बल १५ दिवस उलटले आहेत. या गुन्ह्याचा तपास तीन वेगवेगळ्या यंत्रणांकडे गेला तरीही अद्यापपर्यंत आरोपी अटक नाहीत. वारंवार लोकप्रतिनिधी आणि सामान्यांकडून कॉल रेकॉर्डस तपासण्याची मागणी करत असतानाही मुख्य सुत्रधाराला वाचविण्यासाठी असे केले जात नाही. मुख्य सुत्रधार वाल्मीक कराड आहे, हे संपूर्ण जिल्ह्याला माहीती आहे. परंतु ते एका सत्ताधार्याचा उजवा हात असल्याने त्यांना पाठीशी घातले जात आहे. या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि जिल्ह्यात वाढणाऱ्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीडमध्ये आज शनिवारी (दि.२८) रोजी आयोजित केलेल्या सर्वसमावेशक मूक मोर्चामध्ये सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

# वीर बाल दिवस हा भारतीय संस्कृती आणि मूल्यांच्या रक्षणासाठी कोणत्याही प्रकारचा त्यागाची प्रेरणा देतो–शंकरराव देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**कडा दि.२६ डिसेंबर**

वीर बाल दिवस हा भारतीय संस्कृती आणि मूल्यांच्या रक्षणासाठी कोणत्याही प्रकारचा त्यागाची प्रेरणा देतो असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी कडा येथे केले.

कडा येथील श्रीराम विद्यालयात वीर बाल दिवस साजरा करण्यात आला . याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, मुख्याध्यापक महादेव दानवे, मुख्याध्यापक संजय कोथमिरे, उपप्राचार्य डॉ. संजय धोंडे, अशोक पवळ, अशोक खंदारे, परदेशी, महेश पवळ, हरिश्चंद्र बोडखे उपस्थित होते.



गतवर्षी पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६ डिसेंबर हा दिवस वीर बाल दिवस म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले त्याप्रमाणे आज देशभरात वीर बाल दिवस साजरा होत आहे. श्रीराम विद्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रारंभी वीर बालक जोरावर सिंह व फत्तेसिंह यांच्या प्रतिमेची पुजा करुन अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी शंकरराव देशमुख यांनी सांगितले की,शिख धर्माचे दहावे गुरु गोविंद सिंह यांना चार मुले होती. गढवाल प्रांतातील पाक व्याप्त पंजाबमध्ये गुरु गोविंदसिंग यांचे कुटुंब काही लोकांनी संपविले. त्यांची दोन लहान मुले अनुक्रमे जोरावर सिंह व फत्तेसिंह यांनाही मारण्यात आले. ते सहा व आठ वर्षांची होती. गुरु गोविंद सिंग यांच्या साहिबजादांनी मातृभूमी आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी लहान वयातही शत्रूंचा धैर्याने सामना केला. प्रत्येककला स्फुर्ती मिळावी यासाठी हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करीत ज्ञान वाढवावे तसेच वीर बालकांचे स्मरण करीत रहा. या दोन बालकांचे स्मरण व्हावे म्हणून वीर बालक दिवस साजरा केला जातो. प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी गरजवंताला सहकार्य करण्याचे काम केले पाहिजे. एखादा संकटात असेल तर त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे वीरता दाखविणे. देश धर्मासाठी काम केले पाहिजे.पुढील वर्षापासून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येईल. वीर बाल दिवसानिमित्त श्रीराम विद्यालयातील प्रत्येक कामात धाडसाने सहभागी होत असलेले तसेच विनम्र अशा समाधान गोंदकर, करण गोंदकर यांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी शंकरराव देशमुख यांची निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुभाष धोंडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार शिंदे यांनी मानले.

# ज्ञानदीप विद्यालयाला राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२६ डिसेंबर**

धारूर येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सतत प्रोत्साहन देऊन उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. यासाठी विद्यालयाला ज्युनिअर आय.ए.एस. कॉम्पिटिशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

विद्यालयात दुसरी वर्गापासूनच विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करवून दिली जाते. गेल्या दहा वर्षांत राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. यामुळे विद्यालयाला हा प्रतिष्ठित पुरस्कार मिळाला आहे.

लातूर येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.एस. शेख आणि स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख शिक्षक सचिन चव्हाण, विठ्ठल सुरवसे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

शिक्षण क्षेत्रात मोलाची कामगिरी:

ज्ञानदीप विद्यालयाची ही कामगिरी शैक्षणिक क्षेत्रात एक उज्वल उदाहरण आहे. विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा यश संभवला आहे. या पुरस्काराने शाळेचे, शिक्षकांचे आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्पर्धा परीक्षांचे महत्त्व:

आजच्या युगात स्पर्धा परीक्षांचे महत्त्व वाढले आहे. ज्ञानदीप विद्यालय या गोष्टीची जाणीव करून देत विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी प्रोत्साहित करते.

विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा:

या पुरस्काराने विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे. तेही आता स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी अधिक मेहनत करण्यास प्रेरित झाले आहेत.

शिक्षण क्षेत्रातील योगदान:

ज्ञानदीप विद्यालयाने शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. विद्यालयातील विद्यार्थी भविष्यात देशाची सेवा करण्यासाठी सक्षम होतील, याची खात्री वाटते.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायत व उपजिल्हा रुग्णालय परळीच्या वतीने महिला आरोग्य तपासणी शिबिर संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ डिसेंबर**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक जागृती पंधरवडा अखिल भारतीय ग्राहक पंचायत परळी वैजनाथ तालुका शाखेच्या वतीने विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यात येत आहे त्यामध्ये दिनांक २६ डिसेंबर रोजी महिला आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात शेकडो महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

गुरुवार दिनांक २६ डिसेंबर रोजी परळी उपजिल्हा रुग्णालय येथे सकाळी दहा वाजता या आरोग्य तपासणी शिबिराचा मान्यवरांच्या उपस्थिती शुभारंभ झाला. दिवसभर चाललेल्या या शिबिरात शेकडो महिलांच्या आरोग्याचे तपासणी तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर अरुण गुट्टे ,डॉक्टर यमुना गायकवाड, डॉक्टर ऐश्वर्या कोकाटे, सविता चाटे ,प्रीती वावळे ,संजय नागरगोजे ,अविनाश वावळे ,नंदिनी भातांगळे, गुड्डेराव जळकोटे अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या अध्यक्षा चित्रा देशपांडे, संघटन मंत्री विजया दहिवाळ, उपाध्यक्ष तारावती अग्रवाल, सदस्य संध्या सरोदे, सुनिता बोडके, रुक्मिणी अग्रवाल आदी उपस्थित होते.

# श्री चिंतेश्वर प्राथमिक विद्यालयात वीर बाल दिन उत्साहात साजरा



आज विद्यालयमध्ये वीर बाल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक जोशी सर, प्रमुख पाहुणे म्हणून घोलप सर, तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शिंगणे सर हजर होते.राष्ट्र विकासासाठी मुलांचे योगदान महत्त्वाचे आहे की नाही. या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. तसेच इयत्ता पहिली ते चौथी चित्रकला स्पर्धा व इयत्ता पाचवी ते आठवी निबंध स्पर्धा घेण्यात आली.

# विविध समाजांच्या संघटनांचा आजच्या मोर्चाला पाठिंबा

**मारेकऱ्यांना फाशीची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ डिसेंबर**

२८ डिसेंबर रोजी बीडमध्ये होणार्या सर्वसमावेशक मोर्चाला विविध समाजांच्या संघटनांनी पाठिंबा दिला आहे. तसेच स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणीही या संघटनांनी केली आहे.

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अमानुष मारहाण करून क्रुर हत्या केल्याच्या घटनेला तब्बल १५ दिवस उलटूनही अद्यापपर्यंत आरोपी आणि मुख्य सुत्रधार अटकेत नाहीत. स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध आणि गुन्ह्यातील सुत्रधार व सर्व आरोपी यांना अटक करून फाशीची शिक्षा द्यावी या मागण्यांसह बीड जिल्ह्यातील विविध समाजाच्या संघटनांनी दि.२८ डिसेंबर रोजी होणार्या मूक मोर्चाला पाठिंबा दिला आहे. यामध्ये प्रामुख्याने मुस्लिम समाज बीड जिल्हा, राष्ट्रीय कॉंग्रेस ओ.बी.सी. विभाग बीड शहर, चर्मकार समाजाची संघटना संत रविदास प्रतिष्ठान, भटक्या विमुक्त जमाती संघटना, बेलदार समाज संघ, महाराष्ट्र राज्य परीट सेवा मंडळ, धनगर समाज महासंघ, राष्ट्रीय नाभिक संघटना, साळी समाज संघटना (मुरलीधरबुवाचा मठ), सुतार समाजाची विश्वकर्मा विराट संघ, राष्ट्रीय गुरव समाज महासंघ, कोष्टी समाजाचे श्री.चौंडेश्वरी देवी मंदिर ट्रस्ट या आणि अशा अनेक संघटनांनी बीड येथे होणाऱ्या सर्वसमावेशक मूक मोर्चाला पाठिंबा दिला आहे.

# मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींकरीता कायदेशीर प्रशिक्षण शिबीरामध्ये मान्यवरांचे माहितीपुर्ण मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**

मानसिक आजारी व बौध्दिक व दिव्यांग व्यक्तींकरीता कायदेशीर प्रशिक्षण दोन दिवसीय शिबीर जिल्हा न्यायालयात झाले असून यात मान्यवरांचे माहिती पुर्ण मार्गदर्शन लाभले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटक आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांनी केले. सदर कार्यक्रमास डॉ. मुजाहिद मोहम्मद जिल्हा शासकीय रूग्णालय बीड, जी.जी.सोनी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ॲड.पि.व्ही.दगडखैर मुख्य विधी सहायक संरक्षक लोकअभिरक्षक कार्यालय बीड, अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड, ॲड.ए.एस.कदम विधीसहाय संरक्षक, अधिकार मित्र तत्वशिल कांबळे, मिथुन जोगदंड, महेश कानपाठक, किरण नन्नवरे हे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण मुंबई, यांच्या सुचनेनुसार जिल्हयामध्ये मुलासांठी कायदेशीर मदत सेवा केंद्र प्रशिक्षण शिबीराचे आयोजन हे जिल्हा न्यायालयात दि. २३.१२.२०२४ व २४.१२.२०२४ या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा.जी.जी.सोनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले मनोन्याय या समितीबद्दल सविस्तर मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तीकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने मनोन्याय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमूळे मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींना न्याय मिळवणे सोपे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ॲड.पि.व्ही.दगडखैर यांनी मानसिक आरोग्याकरीता कायदेशीर सूविधा याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. ॲड. अमित कदम हे मार्गदर्शन करताना म्हणाले की,मानसिक आजार असलेल्या व्यक्तीचे हक्क आणि बौध्दिक दृष्टया कमकुवत असलेल्या व्यक्ती करीता कायदेशीर मदत यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. मुजाहिद मोहम्मद यांनी तज्ञ म्हणुन मार्गदर्शन करताना म्हणाले की, सध्याची तानतनावाची परिस्थिती व धावपळीचे जीवन यामध्ये मानसिक आजारी रूग्णांची संख्या वाढत असुन त्यावर तात्काळ उपचावर घेणे हे गरजेचे आहे. मानसिक आजार लपविल्यामूळे वाढतो. जर आपण वेळेवर उपचार घेतला तर, आपणास फायद्याचे ठरते. जिल्हा शासकीय रूग्णालय बीड येथे मानसिक रूग्ण यांचे उपचार केले जातात.

तज्ञ डॉ. सुदाम मोगले यांनी आपला समाज व आपली सामाजिक परिस्थीती मानसिक आरोग्याच्या बाबतीत जागरूक नसल्यामूळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडत आहे. असे सांगत, प्रत्येक व्यक्तींनी मानसिक आरोग्याच्या बाबतीत सजग राहून त्यासंदर्भातील कायदे, मानसिक आरोग्याच्या सुविधा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने स्थापन झालेल्या मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तिकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने मनोन्याय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तरी आपल्या जिल्हयात यासंदर्भात काम सुरू झालेले असून याचा सर्वानी लाभ घ्यावा, अे आवाहन त्यांनी यावेळी केले.तत्वशील कांबळे यांनी मार्गदर्शन करत सांगितले, बालकांचे मानसिक आरोग्य जपणे खुप गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक बालक हा समान असुन त्यांचे शारीरीक व मानसिक आरोग्याची तपासणी गरजेनुसार करून घ्यावी.मिथुन जोगदंड यांनी विधीदुताचे (अधिकारमित्र) यांचे कार्यप्रणाली कशी असते याची सविस्तर माहिती दिली. मदतीसाठी टोल फ्री नंबर १५१०० कायदेशीर मदतीसाठी टोल फ्री नंबर सागितला टेलि मानस चे टोल फ्री क्रमांक १४४१६ ची माहिती दिली.अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती, बीड यांनी मनोरूग्ण व्यक्तीला सहानुभूतीपुर्वक हाताळले पाहीजे. मानसिक आजार याला जागतिक पातळीवर आजाराची मान्यता मिळाली आहे. त्यामूळे त्यावर ईलाज होऊ शकतो आणि मानसिक रूग्ण पुर्णपर्ण बरा होऊ शकतो. ही बाब लक्षात ठेवून मनोरूग्णाशी चांगल्या तऱ्हेने वागले पाहिजे.या शिबीरात जिल्हयातील तालुका विधी सेवा प्राधिकरणातील विधीदुत उर्फ अधिकार मित्र हे बहुसंख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# निरपेक्ष भावनेने केलेले कार्य समाजासाठी आदर्श ठरते : ॲड. मिलिंद पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

कोणत्याही मान सन्मानाची अपेक्षा न ठेवता सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था या समाजासाठीचे खरेखुरे आदर्श आहेत, असे प्रतिपादन लोकसेवा समिती धाराशिव संस्थेचे अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील यांनी केले. भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न श्रध्देय कै. अटलबिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीच्या निमित्ताने लोकसेवा समिती धाराशिव या संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या लोकसेवा पुरस्कार २०२४ वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. याप्रसंगी लोकसेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, सचिव कमलाकर पाटील समितीचे सदस्य शेषाद्री डांगे, समितीच्या सदस्या सुषमा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमा पुजनाने व दीप प्रज्वलनाने झाली.

समाजात निरपेक्ष वृत्तीने कार्य करणाऱ्या परंतु प्रसिध्दी पासून दूर राहत समाजसेवेचे व्रत अविरतपणे सुरु ठेवणाऱ्या व्यक्तींचा व त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव म्हणून लोकसेवा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पुरस्काराचे हे १५ वे वर्ष आहे. यंदाचे लोकसेवा पुरस्कार उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन व्यक्तींना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम अकरा हजार रुपये, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, साडी, श्रीफळ, बुके असे आहे.

सन २०१४ साली स्थापन केलेल्या पसायदान या सेवा प्रकल्पाच्या माध्यमातून ढेकणमोहा (ता.जि. बीड) येथे अनाथ, भटके, वंचित, आत्महत्याग्रस्त शेतकरी व कैद्यांच्या मुलांसाठी शिक्षण व संस्कार देण्याचे महत्वपूर्ण कार्य गोवर्धन निवृत्ती दराडे गेल्या दहा वर्षांपासून अविरतपणे करत आहेत. एकूण ७५ गरजू मुलांच्या आयुष्याला आकार देण्याचे कार्य या प्रकल्पात केले जात आहेत. दराडे यांच्या प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन लोकसेवा समितीच्या वतीने अत्यंत मानाचा असा लोकसेवा पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

श्री. तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संत तुकाराम गुरुकुलाच्या



माध्यमातून लिखित पिंपरी (ता. परतूर जि. जालना) येथील रामकिसन काशिनाथ सोळंके हे मराठवाड्यातील दुर्गम भागातील गरीब, गरजू होतकरु मुलांसाठी वसतीगृहात शिक्षण व संस्कार देण्याचे काम करत आहेत.

विविध प्रकारच्या व्यावसायिक शिक्षणाचे प्रशिक्षण मुलांना देऊन कृतीशील शिक्षणाद्वारे मुलांमध्ये राष्ट्रभक्ती, स्वावलंबन व संस्कार देण्याचे कार्य सन १९९५ पासून सातत्याने केले जाते. सोळंके यांच्या प्रेरणादायी कार्याची दखल घेत लोकसेवा समितीच्या वतीने त्यांना यंदाचा प्रतिष्ठेचा लोकसेवा पुरस्कार २०२४ देण्यात आला. नळदुर्ग (ता. तुळजापूर जि. धाराशिव) येथील मीराताई दत्तात्रय मोटे या सन २०१० पासून भटके विमुक्त समाजातील मसनजोगी, बेडा जंगम, वैदू, नाथपंथी, डवरी गोसावी, पाथरवट अशा वेगवेगळ्या १८ प्रकारच्या वंचित कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी पालावरची शाळा चालवितात. प्रेरणादायी कार्यामुळे दरवर्षी या पालावरच्या शाळेत १५० वंचित मुले शिक्षणाच्या प्रवाहात येतात. श्रीमती मोटे यांच्या या महत्वपूर्ण कार्याचा यथोचित सन्मान म्हणून यंदाचा मानाचा लोकसेवा पुरस्कार-२०२४ त्यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी सत्कारमूर्ती गोवर्धन दराडे, रामकिसन सोळंके व श्रीमती मीराताई मोटे यांनी आपले मनोगते व्यक्त करुन त्यांचे प्रेरणादायी कार्य समाजासमोर मांडले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेच्या छाननी समिती सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ॲड. मुकुंद पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी लोकसेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, समितीचे सदस्य शेषाद्री डांगे, समितीच्या सदस्या सुषमा पाटील यांचीही समयोचित भाषणे झाली. याप्रसंगी प्रास्ताविकात बोलताना लोकसेवा समितीचे सचिव कमलाकर पाटील यांनी लोकसेवा पुरस्कार देण्यामागची संस्थेची भूमिका विशद केली. लोकसेवा पुरस्कारासाठी विनय जकाती (गुलबर्गा), डॉ. अभय शहापूरकर (धाराशिव), माणिकराव टेंगरे (येवती), शंकर साठे (येवती), दयानंद राठोड (बावी) डॉ. मनिष देशपांडे (धाराशिव) या दात्यांनी आर्थिक सहकार्य केले.

प्रा. शशिकांत देशमुख यांनी 'जहाँ दिव्यता ही जीवन है' वैयक्तिक गीत सादर केले.

प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी सुत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त नारायणगाव येथे भारतीय कृषक समाज शेतकरी मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२६ वी जयंती उत्सव निमित्त भारतीय कृषक समाज शेतकरी मेळावा व डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार सोहळा भारतीय कृषक समाज, नवी दिल्ली संलग्न भारतीय कृषक समाज, महाराष्ट्र राज्य आयोजित आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान असलेले भारताचे पहिले कृषी राज्यमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२६ वी जयंती उत्सव सोहळा दि.२७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव, पुणे-नाशिक हायवे, ता. जुन्नर, जि. पुणे येथे आयोजन केले होते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्त भारतीय कृषक समाज शेतकरी मेळावा तसेच कृषी व उद्योगक्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कारांसाठी भारतीय कृषक समाज महाराष्ट्र राज्य कमिटीने पुढील मान्यवरांची निवड केलेली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जलरत्न पुरस्कार डॉ. चंद्रकांत भोयर (नागपूर), कृषीरत्न पुरस्कार आकाशचंद्र मातीसिंग गौरठाकुर (छ. संभाजीनगर), केशवराव



गोपाळराव देशमुख (अकोला), मनिषा सुनिल पोटे (नाशिक), यज्ञेश वसंत सावे (पालघर) तसेच कृषीभूषण पुरस्कार बाळासाहेब बाबासाहेब पाटील (सांगली), दत्तात्रय बाबुराव घाडगे (सोलापूर), प्रा. रंगनाथ बाजीराव भापकर (अहिल्यानगर), मनोज जानरावजी जवजाळ (नागपूर), विजय भानुदास मुळे (ता. खटाव, जि. सातारा) तसेच उद्योगभूषण पुरस्कार सपना पंकज तायडे (अमरावती), राधिका रुपेश घाटगे (शिरूर, घोडनदी), अनुराधा राहुल काशिद (भोर, पुणे), रुपाली शेषराव गायकवाड (बुलढाणा), संतोष देवराव गादे (नेवासा, जि. शिर्डी) या निवड झालेल्या मान्यवरांना कार्यक्रमात पुरस्कार देण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जयंती सोहळ्यासाठी भारतीय कृषक समाज राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. कृष्णबीर चौधरी, नवी दिल्ली व प्रभारी ज्योती सुरसे, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. सुभाष नलांगे, महिलाध्यक्षा स्वाती बोरीकर यांच्या उपस्थितीत हा जयंती, शेतकरी मेळावा व पुरस्कार सोहळा संपन्न झाला . या कार्यक्रमात मनोज मंत्री, संचालक गिन्नी ॲग्रो प्रो.लि. नागपुर, लिंगराज पाटील, राष्ट्रीय उपाध्यक्ष, भा.कृ. स. बेळगांव, अनिल मेहेर कृषीरत्न व कार्याध्यक्ष ग्रामोन्नती मंडळ नारायणगांव तसेच डॉ. प्रकाशसिंह रघुवंशी प्रगतशिल शेतकरी, वाराणसी या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित केला आहे. तसेच भारतीय कृषक समाज महाराष्ट्र राज्य यांनी ७ विभागांमध्ये जैविक ग्राम संकल्पना राबविण्याची ठरविली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रात प्रथम पुणे विभागाची निवड झाली असून पुणे विभागातील अहिल्यानगर जिल्ह्यातील जैविक ग्राम कासारे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर या गावाची निवड केली आहे. या जयंती सोहळा व मेळाव्यासाठी महाराष्ट्र राज्यातून एफ.पी.ओ., डॉ. पंजाराव देशमुख सेंद्रीय शेती गट, शेतकरी, महिला बचत गट, उद्योजक, युवा व युवती शेतकरी समुहगट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यापारी महासंघाच्या नवीन सभासद नोंदणीस सुरुवात

## जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

धाराशिव शहरामध्ये गेल्या ५० वर्षापासून व्यापार्यांच्या प्रश्नांसाठी झगडणारी संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाने धाराशिव शहरात नवीन सभासद नोंदणीस सुरुवात केली आहे. सदर सभासद नोंदणीस व्यापारी बांधवांचा प्रतिसाद मिळत आहे. धाराशिव शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी सभासद नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी केले आहे.

जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव म्हणाले की, धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघ हा राज्य पातळीवर व देशपातळीवर काम करणाऱ्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड ॲग्रीकल्चर व देशातील सर्वोच्च व्यापारी संघटना कॉफिडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स अर्थात कॅट या संघटनांशी संलग्नित आहे. जिल्हा व्यापारी महासंघ धाराशिव शहरासह जिल्ह्यातील परंडा, भूम, वाशी, कळंब, तुळजापूर, नळदुर्ग, लोहारा, मुरुम, उमरगा तालुक्यामध्ये गेल्या पन्नास वर्षापासून कार्यरत आहे.

सध्या धाराशिव शहरामध्ये सन २०२५-२६ या दोन वर्षासाठी सभासद नोंदणी सुरु करण्यात आलेली आहे. दोन वर्षासाठी नाममात्र सभासद शुल्क पाचशे रुपये ठेवण्यात आलेले आहे.

यासोबत व्यापारी महासंघाचा बोर्ड देखील देण्यात येणार आहे. सध्या देशपातळीवर कॅटच्या माध्यमातून ७ कोटी व्यापारी सभासद झालेले आहेत.

तरी व्यापारी बांधवांनी नवीन सभासद नोंदणी करुन घ्यावी, असेही जिल्हाध्यक्ष जाधव यांनी कळविले आहे.

# ग्रंथपालन वर्गास एक जानेवारीपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ डिसेंबर -**

ग्रंथालय संचालनालय मुंबई संचलित ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या सन २०२५ च्या तुळजापूर येथील केंद्रात प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून बारावी उत्तीर्ण असलेल्या इच्छुकांनी आपले अर्ज सादर करावेत. सदरील अभ्यासक्रम सहा महिन्याचा असून आठवड्यातून शनिवार व रविवार अशा दोन दिवस तासिका होणार आहेत.

ग्रंथपालन वर्ग १ जानेवारी २०२५ पासून नियमितपणे सुरू होतील. वर्गाचा कालावधी १ जानेवारी ते ३० जुन २०२५ असा आहे. सदर वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी ग्रंथपालन वर्ग व्यवस्थापक यांच्याजवळ ३० डिसेंबर पर्यंत

विहित नमुन्यात अर्ज भरून सोबत बारावी उत्तीर्ण गुणपट, टीसी, आधार कार्ड सत्यप्रत व तीन

पासपोर्ट फोटो तसेच जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सार्वजनिक ग्रंथालयात कार्यरत असलेल्या अनुभव प्रमाणपत्र जोडावे.

प्रवेशासाठी संपर्क ग्रंथमित्र व.ग. सुर्यवंशी पर्णकुटी शुक्रवार पेठ,

ग्रंथपाल सुरेश जोशी विजय वाचनालय, हनुमंत भुजबळ य.च.

महाविद्यालय, विनायक मस्के तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर,

ग्रंथपाल सुयश जोशी नगर वाचनालय धाराशिव यांच्याशी संपर्क करावा असे आव्हान जिल्हा ग्रंथालय संघाच्यावतीने ज्ञानेश्वर पाटील यांनी केले आहे.

# शहापूर शाळेची शैक्षणिक सहल संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ डिसेंबर -**

तालुक्यातील शहापूर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाची शैक्षणिक सहल समृद्ध कोकण पर्यटनासह पश्चिम महाराष्ट्रात विविध तीर्थक्षेत्र आणि निसर्ग सौंदर्य पाहत १९ ते २३ डिसेंबर दरम्यान संपन्न झाली.

शालेय विद्यार्थ्यांना महाराष्ट्र भूमीतील भौगोलिक विविधता अभ्यास शिकत असताना प्रत्यक्ष पाहता यावा याउद्देशाने विद्यालयाचे मुख्याध्यापक अमीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सहलीचे आयोजित केली होती. स्वराज्याची राजधानी रायगड किल्ल्यासह मुरुड जंजिरा किल्ला, महाड येथील चवदार तळे,श्रीवर्धन बीच, शिखर शिंगणापूर, गोंदवले मठ, वाईचा गणपती, महाबळेश्वर, पाली येथील बल्लाळेश्वर गणपती, केतकावळी येथील प्रतिरूप बालाजी, जेजुरी खंडेराया, मोरगाव येथील गणपती दर्शन घेऊन पंढरपूर, सोलापूर मार्गे शहापूर येथे सुखरूप विद्यार्थी पोहोचले.

या सहलीमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक अमीर शेख, विकास जोत, पठाण युनुस शेरखाँ, स्वाती गायकवाड, प्रल्हाद काळे, कविता मानकरे, वैशाली सुरवसे, एसटीचे चालक मस्के, आकाश गोरे आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# हातलादेवी मंदिर परिसरात बांधलेल्या कठड्याची नासधूस करणाऱ्या समाजकंटकांवर गुन्हा दाखल करा






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

धाराशिव शहराच्या पश्चिमेस असलेल्या हातलादेवी मंदिर परिसरात नागरिकांना बसण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कठड्यांची अज्ञात समाजकंटकांनी तोडफोड करुन नासधूस केली आहे. त्यामुळे मंदिर परिसराचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण झाले असून भाविकांसह धाराशिवकरांमधून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. बुधवार, दि.२५ डिसेंबर रोजी सकाळी येथे मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांना हा प्रकार निदर्शनास आला आहे. याबाबत धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात समाजकंटकाविरोधात तक्रार देण्यात आली आहे.

हातलादेवी मंदिराच्या डोंगरावर भाविकांसह पर्यटक देखील मोठ्या संख्येने दररोज येतात. स्थानिकांच्या पुढाकारातून नागरिकांना बसण्यासाठी हातलादेवी मंदिर परिसरात ठिकठिकाणी कठडे बांधण्यात आलेले आहेत. परंतु अज्ञात समाजकंटकांनी या कठड्यांची तोडफोड केली आहे. त्यामुळे भाविकांच्या भावना दुखावल्या आहेत. असे समाजविघातक कृत्य करणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन तात्काळ अटक करावी. तसेच अशा समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी, जेणेकरुन यापुढे असे कृत्य करण्याचे धाडस कोणी करणार नाही, अशी मागणी सुधीर रामेश्वर पवार यांनी केली आहे.

यावेळी आकाश नरोटे, सलीम पठाण, जफर शेख, कुंदन शिंदे उपस्थित होते.

# धाराशिव शहरातील अंबिका वडा पाव सेंटरवर धाड

## दोन बालकामगारांची सुटका, मालकावर गुन्हा दाखल...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

जिल्ह्यातील बालकामगार प्रतिबंध आणि नियमन अधिनियम १९८६ अंतर्गत जिल्हा कृतीदल बालकामगार समितीच्या वतीने दि.२४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.४५ वाजता येडशी रोडवरील अंबिका वडा पाव सेंटर येथे धाडसत्र राबविण्यात आले.

सदर कारवाईत वयस्कर मालक शंकर ढेकळे यांच्या आस्थापनेवर दोन बालकामगार काम करत असल्याचे आढळून आले.

त्वरित उपाययोजना करत, या बालकामगारांना जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी यांच्या समन्वयाने जिल्हा बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले.

सदर प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात शंकर ढेकळे यांच्या विरोधात प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे. या धाडसत्रात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, चाईल्ड लाईन धाराशिव, धाराशिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पोलीस अधिकारी, आणि युवा ग्राम विकास मंडळ धाराशिव यांच्या अस्सेस टू जस्टीस प्रकल्पाच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. आरोग्य विभागाचे प्रतिनिधी देखील या कारवाईत उपस्थित होते.

सदर कारवाईत सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे यांनी पुढाकार घेतला.

# महेंद्र धुरगुडे यांच्या वतीने अजित पवार यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ डिसेंबर -**

धाराशिव जिल्हा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांनी (दि.२४) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबई येथे भेट घेतली.

महाराष्ट्रामधील विधानसभा निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच महायुती घवघवीत यश मिळाल्याबद्दल व अजितदादा यांची पुन्हा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्यावतीने भेट घेऊन सत्कार व अभिनंदन करण्यात आला.

# बळिरामपूर येथे जुन्या वादातून तरुणाचा खून

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २७ डिसेंबर**

जुन्या वादातून बळीरामपूर येथील रहिवासी विशाल सरोदे या तरुणाचा चाकूने भोसकून खून केल्याची घटना दिनांक २६ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान घडली सदरील घटनेतील आरोपी फरार असून त्यांचा शोध ग्रामीण पोलीस करीत आहेत.


मयत विशाल सरोदे

ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील बळीरामपूर येथील रहिवासी विशाल सरोदे(३०) असून त्यांचे आरोपी सोबत जुन्यावादातून दिनांक २६ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान हाणामारी झाली. त्या हाणामारीत चाकूने मयताच्या पोटात वार केल्याने त्यातच त्यांचा मृत्यू झाला ही घटना समजतात घटनास्थळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशील कुमार नायक,सहाय्यक पोलीस अधीक्षक किरीतीका सी.एम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराव व ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे यांनी धाव घेऊन घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला याप्रकरणी आरोपी नितीन डोंगरे, प्रकाश क्षीरसागर व त्यांच्या अन्यसाथीदाराविरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फरार आरोपींचा शोध पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गडवे हे पुढील तपास करीत आहेत.

# मोठ्याने हॉर्न वाजवल्याने गाडीच्या टपावर चढून चालकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ डिसेंबर**

मोठ्याने हॉर्न वाजवल्याने एका तरुणाने हुज्जत घालत एका चारचाकी वाहनावर चढून चालकाला बेदम मारहाण केल्याची घटना आज दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता नांदेड शहरातील आयटीआय चौकात घडली. वाहन चालकाने त्याच्यासहीत सदर वाहन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आणले. पोलिसांनी सदर युवकास ताब्यात घेतले.

आज सकाळी साडेअकरा वाजता लोहा तालुक्यातील माळाकोळी येथील डॉ. प्रकाश नागरगोजे हे आपल्या गावाकडे जात असताना आयटीआय चौकात पायी चालणारा एक तरुण तेथे



आला. चालकाने हॉर्न वाजविल्याने त्या तरुणाला राग आला. त्यानंतर सदरचा तरुण गाडीच्या टपावर चढला आणि त्याने जोरजोरात हॉर्न का वाजवत आहेस, अशी विचारणा करुन नागरजोगे यांना शिवीगाळ सुरु केली. तसेच गाडीच्या टपावर जावून चालकाच्या बाजूने जाऊन चालकास मारहाण करण्यास सुरुवात केली. पंधरा ते वीस मिनिटे हा प्रकार सुरु असताना त्याठिकाणी बघ्यांची गर्दी जमा झाली. अशाही अवस्थेत संयम न ढळू देता डॉ. प्रकाश नागरगोजे यांनी त्या युवकासह तशाच अवस्थेत गाडी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आणली. शिवाजीनगर पोलिसांनी सदर युवकास ताब्यात घेतले असून, त्याचे नाव शैलेश अवधुते (२४) रा. तेहरानगर असे आहे.

त्याच्या डोक्यावर थोडासा परिणाम असल्याचा पोलिसांना अंदाज आला. त्याच्यावर पोलिसांनी कारवाई केली असून, त्यानंतर त्यास सोडून देण्यात आले. घडलेला हा प्रकार झाल्यानंतर काहीकाळ आयटीआय परिसरातील वाहतूक ठप्प झाली होती.

## संक्षिप्त वृत्त



### स्वामी विवेकानंद शेळेत विज्ञान प्रदर्शन

**मुदखेड**-मुदखेड तालुक्यातील बारड येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड संचलित, स्वातंत्र्य सेनानी राजाराम बापू माध्यमिक शाळेत प्रथमच दि. २७ डिसेंबर रोजी शालेय स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शन उद्घाटन प्रसंगी शैक्षणिक संस्थेचे उपाध्यक्ष रमेशचंद्र महाजन, सहसचिव अशोक पाटील गव्हाणे, संचालक भगवान पाटील कांजाळे शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुंबेवार सर, विज्ञान विभाग प्रमुख सौ . रुपाली आडगावकर मॅडम, सौ पाटील मॅडम, राजेगोरे सर,परमेश्वर गव्हाणे सर, रेड्डी सर, समिती शाळेतील व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

### गंगाराम वाघमारे यांचे निधन

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील जेष्ठ नागरिक तथाशेतकरी गंगाराम लालबा वाघमारे(७५) यांचे दि.२६ डिसेंबर रोजी रात्री १२:०५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर



दुसऱ्या दिवशी दि.२७ डिसेंबर रोजी शुक्रवारी दुपारी २:०० वाजता शोकाकुल वातावरणात आदमपुरात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, तीन सूना, नातवंड, एक मुलगी असा मोठा परिवार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शिंदखेड राजा येथील शाळेतील विशेष शिक्षक रामचंद्र वाघमारे, ग्रामीण कवी, गीतकार, निवेदक अनिल वाघमारे, ट्रॅक्टर चालक सुनिल वाघमारे, कपिल वाघमारे यांचे ते वडील होत.

# डॉ. मनमोहन सिंग यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ डिसेंबर**

माजी पंतप्रधान तथा जागतिक अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे नुकतेच निधन झाले. दरम्यान नांदेड काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवार (ता.२७) रोजी जिल्हा कार्यालय येथे खा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, बी. आर. कदम यांच्या उपस्थितीत डॉ. मनमोहन सिंग यांना अभिवादन करण्यात आले. डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाच्या आर्थिक धोरणात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून त्यांची मोठी प्रतिमा राहिलेली आहे. त्यांच्या जाण्याने देशाने एक अर्थऋषी गमावला आहे. या शब्दात खा. रविंद्र चव्हाण यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, बी. आर. कदम, डॉ. श्रावण रँपनवाड, सुरेंद्र घोडसकर, राजेश पावडे, केदार पाटील सांळूके, प्रफुल्ल सावंत, जे. पी. पाटील, मसुद खान, अनिल मोरे, आनंद चव्हाण, अब्दुल गफार, सुरेश हटकर, गंगाधर सोनकांबळे, सत्यपाल सावंत, बापूसाहेब पाटील, माधव पवळे, दिपकसिंग हुजुरीया आदी उपस्थित होते.

# मराठी पत्रकार परिषदेच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी प्रकाश कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. २७ डिसेंबर**

मराठी पत्रकार परिषदेच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस .एम. देशमुख यांनी ही निवड जाहीर केली आहे.

नांदेड जिल्ह्याच्या वृत्तपत्र क्षेत्रात गेल्या ३० वर्षाहून अधिक काळ कणखर , वस्तुनिष्ठ , रोखठोक ,सामान्यांच्या हितासाठी आपली लेखणी झिजविनारे दृष्टे पत्रकार म्हणून प्रकाश कांबळे यांची ओळख आहे. नांदेड जिल्ह्यातील आणि मराठवाड्यातील पत्रकारांच्या



विविध प्रश्नांवर त्यांनी वेळोवेळी आंदोलने केली आहेत. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी शासन दरबारी आवाज उठवला आहे. पत्रकारितेतील आणि मराठी पत्रकार परिषदेतील त्यांच्या एकूण कार्याबद्दल मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी आज प्रकाश कांबळे यांची मराठवाडा उपाध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीबद्दल मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक , विश्वस्त शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीकर, प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मंसुरभाई , अनिल वाघमारे, संदीप कुलकर्णी , सचिन शिवशेट्टे यांच्यासह मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रकाश कांबळे यांचे अभिनंदन करून भावी कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# राज्यस्तरीय उपवधू-वर परिचय मेळाव्यास नोंदणी करावी

## उमरी तालुका पद्मशाली समाज संघटनेचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २७ डिसेंबर**

नांदेड जिल्हात पद्मशाली समाज संघटेनेचे राज्यस्तरीय उपवधू वर परिचय मेळावा आहे या मेळाव्यास पदमशाली समाजाती युवक - युवती यांनी नाव नोंदणी करावे असे अव्हान उमरी तालुका समाज संघटनेनी उमरी येथिल विशेष बैठकीस केले आहे .

अखिल भारत युनायटेड पद्मशाली संगम हैदराबाद व महाराष्ट्र राज्य युनायटे पदमशाली संगम अंतर्गत मराठवाडा युनायटेड पदमशाली समाज संघटना यांच्या वतिने ( युवक - महिला ) नांदेड आयोजीत उपवधू - वर परिचय मेळावा दि ९ फेब्रुवारी २०२५ रोज रविवार सकाळी १० : ०० वाजता स्व भुदेवी किशनसेठ गोरंट्याल सभागृह , मातोश्री मंगल कार्यालय नविन कौठा नांदेड येथे आयोजीत केला आहे .

त्या अनुषंगान उमरी तालुक्यात दि २१ डिसेंबर २०२४ रोजी पदमशाली समाजाची बैठक घेण्यात आली . या बैठकीला रोहीत शास्त्री अडकटलवार, जगन्नाथ बिंगेवार, विजय गड्डम, सचिव दासरवाड, गजानन वासमवार, शंकरराव कुंटुरकर, आदी मान्यवर यांची उपस्थिती होती. दरवर्षी पदमशाली समाज संघटनेकडून हा उपक्रम राबविल्या जात आहे या मेळाव्याचे उद्देश पद्मशाली समाजाची होणारी धावपळ ,वेळ' पैसा , परिश्रम वाचवण्याच्या दुष्टीने योग्य असे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येवून समाजसेवा करणे हाच हेतू आहे असे ही बैठकीत मार्गदर्शन मान्यवराकडून करण्यात आले आहे.

या पद्मशाली राज्यस्तरीय उपवधू वर परिचय मेळाव्यास नांदेड जिल्हा सह उमरी तालुक्यातील समाज बांधवानी प्रसिद्धी पत्रकानुसार संपर्क करून जास्ती जास्त नोंदणी करून दि ९ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या या मेळाव्याला उपस्थित राहावे असे आवाहन पदमशाली समाज संघटनेचे उमरी समाजभुषन-श्रीनिवास अनंतवार ,गणेश यम्मेवार, नारायण यम्मेवार,संदिप टिप्रेसवार, दिलीप यम्मेवार, पोशट्टी बोडोड बोथीकर आदी मान्यवर समाज संघटनेनी केली आहे.

# रस्त्याचे डांबरीकरण करा अन्यथा आमरण उपोषण करू

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. २७ डिसेंबर**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून हिमायतनगर ते पळसपुर -डोल्हारी-सिरपल्ली रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करण्यासाठी शासनाने तब्बल ७ कोटी ३० लाख रूपये एवढा निधी मंजुर करून दिला. तत्कालीन खा. हेमंत पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करून रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली. कंत्राटदार सिद्दीकी यांनी रस्ता खोदून गीटी टाकून दैनिय अवस्था करून टाकली. त्या रस्त्यावरून नागरीकांना ये-जा करत असताना नरक यातना भोगाव्या लागत असून अनेक अपघात झाले आहेत.

७ कोटी ३० लाखामधून अंदाजे कंत्राटदाराने ६० टक्के रक्कम उचल केली असून ती रक्कम कंत्राटदार सिद्दीकीने कुठे खर्च केली असा सवाल येथील नागरीक उपस्थित करीत आहेत. ह्या रस्त्याचे डांबरीकरण व्हावे यासाठी अनेक वेळा तात्कालीन आ. माधवराव पाटील जवळगावकर , प्रशासनाकडे अनेक वेळा तोंडी व लेखी



तक्रारी केल्या परंतू त्याचा काहीही उपयोग झाला नाही. आज घडीला त्या रस्त्यावर गीटींचा ढिगारा तयार झाला असून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर नागरीक जीव मुठीत घेऊन प्रवास करताना दिसून येत आहेत. सततच्या होणाऱ्या त्रासाला कंटाळून पळसपुर-डोल्हारी-सिरपल्ली येथील नागरीकांनी आठ ते दहा दिवसात रस्त्याचे काम नाही केले तर येथील नागरीक तहसील कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसणार असेही सांगितले आहे. यावेळी वामनराव वानखेडे, लक्ष्मण मांजरे, चांदराव वानखेडे, मारोती वाडेकर, गजानन देसरकर, कमलबाई वानखेडे, संजय वानखेडे, वसंत पाटील, दिगांबर वानखेडे, विष्णु जाधव, यासह अनेक महिला नागरीक उपस्थित होते.

# आ. भीमराव केराम यांच्याहस्ते नवीन सिमेंटबॅगचे थाटात उदघाटन




**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २७ डिसेंबर**

सिमेंट विक्रीव्यवसायात अल्पशा कालावधील नावलौकिक प्राप्त केलेल्या किनवट येथील बद्दीवार ट्रेडिंग कंपनी येथे नवीन दलमिया सिमेंट ठउऋ एक्स्पर्ट बॅगचे भव्य उद्घाटन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते थाटामाटात करण्यात आले.

जगप्रसिद्ध दालमिया सिमेंटचे अधिकृत विक्रेते बद्दीवार ट्रेडिंग कंपनीने अल्पशा कालावधीत नावलौकिक प्राप्त केला.दालमिया कंपनीने नुकेतच आरसीएफ एक्सपर्ट नावाची नवीन सिमेंटची बॅग बाजारात आणली आहे. याचे औचित्य साधून बद्दीवार ट्रेडिंगचे मालक सुशील रमेश बद्दीवार यांनी दि.२६ डिसेंबर रोजी किनवट विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांच्या शुभहस्ते दालमिया आरसीएफ एक्सपर्ट या नव्या सिमेंट बॅगचे थाटात उद्घाटन केले आहे.

ही सुरुवात आमच्या उच्च-गुणवत्तेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे आणि भागीदारत्व अधिक मजबूत करण्यासाठीची पावले आहेत असे मत दालमिया कंपनीचे सेल्स शाखाप्रमुख दिनेश श्रीपतवार यांनी याप्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमास गटविकास अधिकारी वैष्णव, ओबीसी नेते रमेश बद्दीवार, भाजप नेते अनिल तीरमनवार , उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेमानीवार, दत्ता आडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस संदीप केंद्रे , कंत्राटदार नागोराव रापनवाड, विठ्ठल श्रीमनवार, आमदार स्विय सहायक निळकंठ कातले, समीर बद्दीवार, नगरसेवक शिवा आंधळे, राष्ट्रवादीचे नेते सुगत नगराळे , विठ्ठल श्रीमनवार , पवन रावते, कंपनीचे तांत्रिक प्रमुख मेराज शेख, तांत्रिक अभियंता विष्णू चव्हाण यांच्यासह तालुक्यातील गुत्तेदार व नागरिक उपस्थित होत

# भोपाल येथे नॅशनल रेनॉल्ड शूटिंगमध्ये अथर बेगची पुन्हा नेत्रदीपक कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**कंधार ,दि. २७ डिसेंबर**

तालुक्यातील कोटबाजारचे भूमिपुत्र मिर्झा अथर बेग मिर्झा जफरउल्ला बेग यांना गेल्या वर्षी दिल्ली येथे ६६ व्या नॅशनल रायफल शूटिंगमध्ये ५० मिटर रेनॉल्ड शूटर स्पर्धेत प्रथम पुरस्कार पटकवला होता. या वर्षी मध्येप्रदेशातील भोपाल येथे २२ डिसेंबर रोजी झालेल्या ६७ व्या नॅशनल रायफल शूटिंग स्पर्धेत ५० मिटर रेनॉल्ड रायफल शूटिंगमध्ये पुन्हा एकदा नेत्रदीपक कामगिरी करत पुन्हा प्रथम येण्याच्या मान पटकवला आहे. त्याच्या या कामगिरीमुळे कंधारचे नाव राष्ट्रीय पातळीवर सलग दुसऱ्या वर्षी चमकले आहे.



मिर्झा अथरबेग यांनी गेल्या वर्षी जिल्हा स्पर्धेत बाजी मारल्याने त्यांची राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी हैदराबाद येथे निवड झाली. या रेनॉल्ड नेमबाज स्पर्धेत ६०० पैकी ५६४ गुण बाजी मारल्याने राष्ट्रीय स्पर्धेत पात्र झाले. राष्ट्रीय रेनॉल्ड नेमबाज स्पर्धेसाठी केरळ राज्यातील तिरुंदपूरम येथे रेनॉल्ड नेमबाज स्पर्धा झाली या स्पर्धेत त्यांनी ६०० पैकी ५७५ गुण घेऊन स्पर्धे जिंकून दिल्ली येथे राष्ट्रीय रेनॉल्ड नेमबाज स्पर्धेत २०२३ साठी पात्र झाले. दिल्ली येथे राष्ट्रीय पातळीवरील ५० मीटर रायफल शूटिंगमध्ये ६०० पैकी ५९५ गुण घेऊन नॅशनल रेनॉल्ड शूटरचा तो मानकरी ठरला आहे. त्यामुळे दिल्ली येथे झालेल्या ६६ व्या राष्ट्रीय नेमबाजा चॅम्पियनशिप स्पर्धेत त्यांना रेनॉल्ड शूटर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

या वर्षी मध्येप्रदेशातील भोपाल येथे २२ डिसेंबर रोजी झालेल्या ६७ व्या नॅशनल रायफल शूटिंग स्पर्धेत ५० मीटर नॅशनल रेनॉल्ड रायफल शूटिंगमध्ये स्पर्धेतून ६०० राऊंमध्ये ५९७ गुण घेऊन पुन्हा एकदा नेत्रदीपक कामगिरी करत प्रथम येण्याच्या मान पटकवला आहे. कंधार-लोहा विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रतपाराव पाटील चिखलीकर, माजी जि. प. सदस्य पुरुषोत्तम धोंडगे यांनी मिर्झा अथर बेग यांच्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिले. माजी नगराध्यक्ष मोहम्मद जफरोद्दीन,माजी उपसभापती मिर्झा शफिल्ला बेग,गुत्तेदार मिर्झा समदानी बेग, कोटबाजारचे सरपंच मोहम्मद अजिमोद्दीन, उपसरपंच प्रतिनिधी शेख पाशा, ग्रामपंचायत सदस्य शेख फारुख, मोहम्मद निसार, शेख नासेर, मोहम्मद शामशोद्दीन, शेख जावेद, मोहम्मद सोहेल, मिर्झा अवेज बेग, पोलीस पाटील प्रतिनिधी मिर्झा यादुल, सय्यद अमजद, शेख मुनीर यांच्यासह आदींनी सत्कार करून कौतुक केला.

# कापुस खरेदीची दुकाने बाजार समितीच्या जागेत बसवा: काळे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २७ डिसेंबर**

दैनंदिन रहदारीस अडथळा होत आहे, सतत ट्राफिक जाम होत असल्यामुळे लोहा ते कंधार रोडवरील तहसिल कार्यालया समोरील कापुस खरेदीचे दुकाने कृषी उत्पन्न बाजार समितीची जागा वखार महामंडळाच्या परिसरातील जागेवर हालवावे अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे यांनी केली आहे.

लोहा तालुक्याचे ठिकाण असुन दैनंदिन दिन जनतेची ये..जा असते .लोहा कंधार रोडवर अनेक शासकीय कार्यालय आहेत तहसिल कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय , भुमी अभिलेख कार्यालय पंचायत समिती कार्यालय, जि.प. उपविभागीय बांधकाम कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय, उर्ध्ववमनार लिंबोटी प्रकल्प कार्यालय आहेत. तालुक्यातील असंख्य नागरिक विविध कामांसाठी, प्रमाण पत्रे, प्रॉपर्टी खरेदी-विक्री, शेती मोजणी, घरकुल योजना, कृषीच्या योजना आदी कामांसाठी असंख्य नागरिक येतात पण लोहा कंधार रोडवर अनेक कापुस खरेदी दुकाने आहेत तसेच



काही हॉटेल्स आहेत यामुळे नेहमी ट्राफिक जाम होत असते कारण कापुस दुकानदार भर रस्त्यावर अवजड वाहने उभे करतात ट्रक, , टेम्पो उभे करुण गाडीत कापूस भरतात या रस्त्याने मोठ्या प्रमाणात वहातुक चालू आसते.यामुळे रहदारीला नेहमीच अडथळा होतो. या रोडवर हॉटेल्स आहेत त्या हॉटेल समोर अनेक मोटारसायकल अस्तव्यस्त लावून निघुन जातात नागरिक या रस्त्याने चालताना जीव मुठीत घेऊन तारेवरची कसरत करावी लागते . त्यामुळे अनेक नागरिक भयभीत होतात. कृषी उत्पन्न बाजार समितीची साडेतीन एकर जमीन वखार महामंडळा जवळ आहे.त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीने कापूस खरेदीसाठी व्यापारी संकुल बांधून लोहा-कंधार रोडवरील कापसाचे दुकाने त्या जागेवर हलवावे, या परिसरात पोलिस प्रशासनाने लक्ष देऊन लोहा कंधार रोडवरील हॉटेल् समोर थांबत असलेल्या दुचाकी, चारचाकी वाहनावर कारवाई करुन नागरिकांना रस्ता खुला करून द्यावा अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक साहेबराव पाटील काळे यांनी केली आहे.

# देशाच्या आर्थिक मजबुतीकरणाचा पितामह हरपला

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ डिसेंबर**

भारताचे १४ वे पंतप्रधान आणि जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ मनमोहन सिंग यांचे गुरुवारी निधन झाले. भारताच्या आर्थिक उदारीकरणाचे शिल्पकार म्हणून त्यांना ओळखले जाते. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस अर्थमंत्री म्हणून त्यांचा कार्यकाळ हा देशाच्या आर्थिक इतिहासातील जलसंधारणाचा क्षण होता. ज्याने जलसंधारणात मजबूत वाढ आणि जागतिक एकात्मतेचा टप्पा निश्चित केला. रोजगार हमी योजना, शिक्षणाचा सक्तीचा अधिकार, माहिती अधिकार, आधार कार्ड, अमेरिकेसोबत अण्वस्त्र करार असे अनेक महत्वपूर्ण निर्णय मनमोहन सिंग यांनी घेतले होते. आर्थिक दृष्ट्या भारताची अवस्था कठीण होत असताना पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी कुशल अर्थनीतीने भारताने जागतिक अर्थव्यवस्थेत बलाढ्य होण्याची पायाभरणी केली. संयमी, दृष्टा आणि राष्ट्राच्या विकासासाठी समर्पित भावनेने काम करणारे नेतृत्व पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या रूपाने आपण गमावले आहोत . देशाच्या आर्थिक विकासाचा पाया भक्कम करणारा पितामह मनमोहन सिंग यांच्या रूपाने हरपला आहे. अशा शब्दात लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव चिखलीकर यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

# डॉ. मेघराज कपूर यांच्या पुढाकाराने बंदिस्त मजुरांची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २७ डिसेंबर**

गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम नक्षलप्रभावीत कोरची भागातील व महाराष्ट्राच्या सीमेलगत असलेल्या छत्तीसगड राज्यातील अठरा विश्व दारिद्र्यात जीवन जगत असलेल्या दुर्गम आदिवासी भागातील मजुरांना मिरची, टमाटर व अंगूर तोडण्याच्या नावाखाली फूस लावून महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या विविध ठिकाणी बंदिस्त बनवून बळजबरीने ऊस तोडणीच्या कामाला लावुन त्यांच्याकडुन सक्तीनी काम मरून घेत असल्याची माहिती मीळताच सिडको येथील समाजकार्य महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.मेघराज कपुर यांनी सापळा लावून त्यांची सुटका करण्यास येश मीळाले या बद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम नक्षलप्रभावीत कोरची भागातील व महाराष्ट्राच्या सीमेलगत असलेल्या छत्तीसगड राज्यातील

मजुरांना गावापासून चार ते पाच किमी अंतरावर शेतात ठेवून त्यांना जवळच्या गावात जाण्यास मज्जाव करण्यात येत होते, मजुरानी मजुरी मागितले असता आम्ही तुम्हाला विकत घेतल्याचे सांगण्यात येऊन तुमच्या ठेकेदाराला पैसे दिल्याचे शेतमालक व मजुरावर पाडत ठेवणाऱ्या कडून सांगितल्या जायचे हळूहळू आपल्याला फसवल्याचे मजुरांना लक्षात आले विशेष म्हणजे ज्या भागातून मजूर आणले होते त्या भागात भात शेती लागवड होत असल्यामुळे त्यांना ऊस तोडणीचा अनुभव नसल्याने पहाटे पाच वाजता ते रात्री दहा वाजता पर्यंत काम करून घेण्यात येऊ लागल्याने व मजुरी मिळत नसल्याने त्रस्त झालेल्या मजुरांनी छुप्या पद्धतीने संपर्क साधून 'आम्हाला मुक्त करा' असा टाहो मजुरांनी फोडला याची कल्पना सिडको येथील प्रा. डॉ. मेघराज कपूर यांना मिळताच समाजकार्याचे भान ठेवत आपल्या सहकार्यासह घटनास्थळाची माहिती घेऊन राज्यातील तुळजापूर पासून ५० की. मी. अंतरावरून ३९ मजुरांना, बीड जिल्ह्यातील माजलगाव भागातून २५ मजुरांना तर कर्नाटक राज्यातील जिल्हा विजापूर तालुका कोलार भागातील शेत शिवारात बंदिस्त ठेवून बळजबरीने काम करवून घेत असलेल्या ठिकाणाहून १५ मजुरांना नाट्यमयरित्या मुक्त करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील कर्मचारी प्रा. सुनील राठोड, गणेश तेलंग, संशोधक विध्यार्थी बुध्दभूषण सिरसे व कर्नाटक राज्यातून क्रिष्णा राठोड यांनी वेगवेगळ्या घटनाक्रमात साथ दिले. प्रा. डॉ. मेघराज कपूर यांच्या नियोजनबद्ध कार्याचे मजुरांचे नातेवाईक व महाविद्यालयातील कर्मचारी यांनी अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य डॉ. डब्लू. आर. मुजावर यांनी समाजकार्याचे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानपुरते नाही तर वेठबिगार म्हणून बंदिस्त मजुरांना बाहेर काढून कृतीच्या आधारे महाराष्ट्राला दाखवून नावलौकिक केल्याचे गौरवोदगार काढून अभिनंदन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. मनीषा मांजरमकर, डॉ. निरंजन कौर सरदार, डॉ. नरहरी पाटील, डॉ. शेख असिफ, डॉ. काठोडे दिलीप, डॉ. रेड्डी विद्याधर, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. लोखंडे प्रतिभा, डॉ. वरगंटे सत्वशीला, प्रा. गोपाळ बडगिरे, प्रा. सुनील गोइनवाड, नरेंद्र राठोड, संतोष मोरे, राजेश्वर पाळेकर, सुनील कंधारकर यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व सबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, श्रीमती नजमुनिसा बेगम गुलाम अंबीय बेगम रा. घुंगराळा ता. नायगाव जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील घुंगराळा ग्रा.पं. च्या हद्दीतील गट क्र. १६९ मधील प्लॉट नं. १०२ ज्याचे क्षेत्रफळ ४२५.४१ चौ.सेमी आहे. चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस - विक्री करणार यांची जागा आहे, पश्चिमेस -नांदेड ते देगलूर रोड, दक्षिणेस- घुंगराळा ते कुंटुर रोड आहे, उत्तरेस - विक्री करणार यांची जागा आहे. या चतु:सिमेच्या आतील प्लॉट (मोकळी आगा) राहूल राजेश बंदमवार रा. घुंगराळा ता. नायगाव जि. नांदेड यांनी खरेदी करण्याचा सौदा केला आहे. बयाणा पोटी काही रक्कम दिली आहे. तरी सदरील प्लॉटबाबत कोणास काही, उजर, आक्षेप मालकी हक्क असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत मंडळ अधिकारी कार्यालय घुंगराळा येथे लेखी कागदपत्रासह आक्षेप दाखल करावा मुदत संपल्यानंतर कोणाचाही उजर, आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**जाहीर प्रगट देणार**
**राहूल राजेश बंदमवार**
**रा. घुंगराळा ता. नायगाव जि. नांदेड**
**मो. नं. ९९२३०२७१११**

# टोयोटा किर्लोस्कर मोटर २०२८-२९ पर्यंत येणार : विक्रम गुलाटी

## ८,००० प्रत्यक्ष नोकऱ्या आणि ८,००० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार

### वायुप्रदूषण टाळण्यासाठी इको गार्डन आणि सोलार प्लांट


कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनकमी करण्याच्या उद्देशाने कर्नाटक सरकारसोबत ४,१०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. या मध्ये २५ एकर जागेमध्ये इको गार्डन उभारण्यात आले आहे तर स्वतःचा सोलर प्लांट वरून युनिटसाठी लागणारे संपूर्ण वीज या सोलर प्लांट मधून वापरली जाते.








**विक्रम गुलाटी**
कंट्री हेड आणि कार्यकारी उपाध्यक्ष, कॉर्पोरेट अफेअर्स आणि गव्हर्नन्स, टोयोटा किर्लोस्कर मोटर



**जी. शंकरा**
कार्यकारी उपाध्यक्ष, वित्त आणि प्रशासन, टोयोटा किर्लोस्कर मोटर



**सुदीप दळवी**
एसव्हीपी आणि मुख्य संपर्क अधिकारी, टोयोटा किर्लोस्कर मोटर

### टोयोटा किर्लोस्कर मोटर चे वाखाण्या जोगे शैक्षणिक कार्य

आर्थिक दृष्ट्या दुर्बल वर्गातील होतकरू विद्यार्थ्यांना जागतिक उत्पादन पद्धतींवर कौशल्य प्रशिक्षण देण्यातसाठी २००७ मध्ये टोयोटा किर्लोस्कर मोटर्स ने टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचा उभारले, ज्यात कर्नाटक राज्यातील १२०० विद्यार्थांना मोफत प्रशिक्षण दिलं जातं. ज्यामध्ये ६०० मुली आणि ६०० मुलांनचा समावेश आहे. ऑटोमोबाईल्समधील सखोल ज्ञान, शिल्पकला आणि शारीरिक फिटनेससाठी (उदाहरणार्थ, खेळ) या बरोबर तरुणांचे मन आणि दृष्टिकोन विकसित करण्यासाठी अनुभवात्मक शिक्षण देण्यासाठी श्रमदान, अनाथालयांमध्ये सेवा, गोशाळा आणि गरीब समुदायांमध्ये कार्य केले जाते.येथे मुलींसाठी विशेष निवास व्यवस्था, नवीन वर्गखोल्या अद्यावत यंत्रणा आहे.



छत्रपती संभाजीनगर (नारायण गायकवाड) : टोयोटा किर्लोस्कर मोटर जून -२०२४ महाराष्ट्र राज्यातील छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे २०,००० कोटी रुपयांच्या प्लांटला उभारणी करणार असल्याची घोषणा केली. प्रत्यक्ष प्लांट उभारणीची सुरुवात कधी होणार याची महाराष्ट्रसह छत्रपती संभाजीनगरकरांनाही उत्सुकता लागली. प्लांट उभारणीच्या प्रत्यक्ष कामाची सुरुवात २०२८-२९ मध्ये होवू शकते असे टोयोटा किर्लोस्कर मोटरचे कंट्री हेड आणि कार्यकारी उपाध्यक्ष, कॉर्पोरेट अफेअर्स आणि गव्हर्नन्स, विक्रम गुलाटी, यांनी सांगितले.

ते पत्रकारांशी बोलत होते.या वेळी जी. शंकरा - कार्यकारी उपाध्यक्ष, वित्त आणि प्रशासन, टोयोटा किर्लोस्कर मोटर, सुदीप दळवी - एसव्हीपी आणि मुख्य संपर्क अधिकारी, टोयोटा किर्लोस्कर मोटर हे उपस्थित होते.

AURIC (औरंगाबाद इंडस्ट्रियल सिटी), छत्रपती संभाजीनगर येथे उत्पादन सुविधेसाठी ८५० एकर जागा देण्यात आल्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती. त्याप्रमाणे

**राज्याच्या मागणीनुसार प्लांटमध्ये काय उभारायचे आहे हे प्रत्यक्ष ठरवण्यात येणार असून ज्याप्रमाणे कर्नाटक राज्यामध्ये उभारण्यात आलेल्या युनिट आहे तसेच युनिट छत्रपती संभाजीनगरमध्ये उभारण्यात येणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.**

टोयोटा किर्लोस्कर मोटर ने ८५० एकर जागेची किंमत जमा केली असून प्रत्यक्ष प्लांट उभारणीला २०२८-२९ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे. छत्रपती संभाजीनगर २०,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह दरवर्षी ४००,००० इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार तयार केल्या जातील, ८,००० प्रत्यक्ष नोकऱ्या आणि ८,००० लोकांना अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

टोयोटा किर्लोस्कर मोटर ने १९९७ मध्ये भारतात काम सुरू केले आणि १९९९ मध्ये उत्पादन सुरू केले. कंपनीने मागील वर्षी घोषणा केल्याप्रमाणे कर्नाटकमध्ये बेंगळुरू जवळ बिदाडी एमआयडीसी मध्ये ३,३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून तिसऱ्या प्लांटच्या कामाला सुरुवात केली आहे. यामुळे TKM ची उत्पादन क्षमता वार्षिक १००,००० युनिट्सने वाढणार असून, कर्नाटकमध्ये २,००० हून अधिक थेट नोकऱ्यांची निर्मिती होणार आहे.

२०२६ मध्ये या तिसऱ्या प्लांट चे काम चालू झाल्यास , TKM ची बिदाडीमधील वार्षिक उत्पादन क्षमता ४४२,००० युनिट्सपर्यंत वाढणार आहे. सध्या कर्नाटकमधील बिदाडी मध्ये, वर्षभरात ३४२,००० वाहने तयार होतात.

### औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी करार

**टोयोटा किर्लोस्कर मोटर्सने कर्नाटकातील ४९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी करार करून आतापर्यंत २९७५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे आणि. कर्नाटकात २०२६ पर्यंत आणखी ८८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची वाढ करण्याची योजना आहे.**

---

## नाथवंशज योगिराज महाराज गोसावी यांना 'ऋग्वेद भूषण' पुरस्कार जाहीर



तभा वृत्तसेवा

पैठण दि २७ :- पुण्याच्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज हभप श्री योगिराज महाराज गोसावी पैठणकर यांना त्यांनी अध्यात्मासाठी दिलेल्या योगदानासाठी संस्थेचा सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे चिटणीस श्री सुनील पारखी यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी यांचे हस्ते हा पुरस्कार दिनांक २९ डिसेंबर रोजी सायंकाळी ५:३० वा सदाशिव पेठेतील उद्यान प्रसाद मंगलकार्यालयात सोहळा संपन्न होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेने नुकतेच आपले शंभर वर्षे पूर्ण केले असून पुरस्काराचे यंदाचे २१ वे वर्ष आहे. या कालावधी संस्थेने आजपर्यंत समाजातील अतुलनीय कार्य करणाऱ्या अनेकांना हा पुरस्कार दिला आहे. त्यात करवीर पीठाचे शंकराचार्य श्री विद्याशंकर भारती, राममंदिर अयोध्याचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेवगिरी, जेष्ठ गायिका प्रभा अत्रे, जेष्ठ शास्त्रज्ञ श्री रघुनाथ माशेलकर, जेष्ठ सिनेदिग्दर्शक श्री राजदत्त, प्राज इंडस्ट्रीचे श्री प्रमोद चौधरी, सौ. कल्याणीताई नामजोशी, फुलगावचे स्वामी स्वरूपानंद सरस्वती, निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ दत्तात्रय शेकटकर, जेष्ठ साहित्यिक ह.मो. मराठे, जेष्ठ मूर्तीतज्ञ डॉ. गो.बं. देगलूरकर, पूर्णवादाचार्य विष्णुमहाराज पारनेरकर, डॉ किसनमहाराज साखरे, हभप चैतन्यमहाराज देगलूरकर, नारायणकाका ढेकणे, हभप मुकुंदकाका जाटदेवळेकर यांचा समावेश आहे.

## आश्रम शाळेत व्यक्तिमत्व विकास,स्पोकन इंग्लिशची कार्यशाळा संपन्न

कन्नड दि.२७ डिसेंबर - तालुक्यातील वडनेर येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा येथे दि.२६ रोजी तीन दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत कै विनायकराव पाटील व्यायाम शाळा व क्रीडा मंडळ सहानगाव यांच्या वतीने दि. २३ ते २६ या कालावधीत तीन दिवसीय व्यक्तिमत्व विकास व स्पोकन इंग्लिश दोन सत्र मध्ये कार्यशाळा संपन्न झाली,प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यशाळा संपन्न झाली कार्यशाळेचे उदघाटन निरीक्षक पी एल कायंदे व मुख्याध्यापक किशोर वारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अतुल धाटबळे,दादा निकम,प्रा. अंबादास सगट,अपर्णा बागुल,राणी मस्के,अतुल बागुल,सह विद्यार्थी,शिक्षक उपस्थित होते.

## हेड कॉन्स्टेबल राजेंद्र काकडे यांचे ग्रा.पो.अ. डॉ. विनायक कुमार राठोड यांचे हस्ते सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान



सिल्लोड : ग्रामीण पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल राजेंद्र काकडे यांनी अनेक गुन्ह्यांची यशस्वीपणे उकल केल्याबद्दल त्यांचे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनायक कुमार राठोड यांचे हस्ते सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले राजेंद्र काकडे यांनी मागील वर्षभराच्या कार्यकाळात अनेक गुन्ह्यांची तपास करताना यशस्वीपणे उकल केल्याने त्यांना हे प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देण्यात आले त्यांच्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

---

# मुलगी डॉक्टर असल्याचे खोटे सांगून जावयाची केली फसवणुक

## कोर्टाचे आदेशाने सासऱ्यावर गुन्हा दाखल

वाळूज महानगर(प्रतिनिधी) डॉक्टर पत्नीच्या शोधात असलेल्या डॉक्टराला माझी मुलगी डॉक्टर आहे असे खोटे सांगून फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने वाळुज एमआयडीसी पोलीस ठाण्यात सासऱ्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की , गांधीनगर येथील डॉ.निलेश दामुजी साठे हे व्यवसायाने डॉक्टर आहेत त्यांचा कमळापूर फाटा रांजनगांव शे.पु. येथे हॉस्पिटल आहे. साठे यांना डॉक्टर पत्नीच हवी असल्यामुळे ते डॉक्टर मुलीच्या शोधात होते . हॉस्पिटल शेजारी अंकुश कानडे यांचे कापड दुकान आहे. त्यामुळे साठे यांच्या चांगल्या ओळखीचे होते. त्यांच्या मार्फत बजाजनगर येथील रहिवासी रामदास शंकरराव बर्फे हे मामा असल्याचे सांगून बैठक बोलावून घेतली. बैठकीत रामदास शंकरराव बर्फे, (सासरा) , वैशाली रामदास बर्फे,(सासू), दिक्षा निलेश साठे,(पत्नी) , अंकुश रामनाथ कानडे,(पत्नीचे नातेवाईक) यांनी दिक्षा ही बीएएमएस डॉक्टर असल्याचे खोटे सांगून त्याचा बायोडाटा दाखवत दिक्षा ही महामाया टेक्नीकल इनव्हरसिटी नोयडा येथे कॉलेजला शिक्षण घेत आहे असे सांगितले होते. मुलगी डॉक्टर असल्यामुळे साठे यांनी लग्न करण्याची तयारी दर्शवली होती. त्यानुसार मुलगी व मुलगा दोघे डॉक्टर असल्याने कोणत्याही प्रकारचा हुंडा,दागदागिण्याची देवान घेवाण करण्याचे ठरले नाही. फक्त लग्न करून देणे बाबत ठरले. त्यानंतर दि. २९ जानेवारी २०२३ रोजी आमृपाली बुध्दविहार बजाजनगर येथे साखर पुडयाचा कार्यक्रम झाला व ३१ मार्च २०२३ रोजी आमृपाली बुध्दविहार विवाह संपन्न झाला.

लग्न झाल्यानंतर पत्नी दिक्षा ही तिन ते चार महिने घरीच होती. साठे यांनी स्वतःच्या दवाखान्यात पत्नी दिक्षा करिता महिला डॉक्टर व महिला पेशंट करिता एक स्वतंत्र कक्ष निर्माण तिला बसण्यासाठीचा कक्ष दाखवून दिला. परंतु तिने पेशंट न पाहता साठे यांना सांगीतले की, माझे शिक्षण चालू असून मला अजून वैद्यकीय डिग्री मिळालेली नाही. यामुळे साठे यांना शंका आल्याने पत्नी दिक्षा हीस तिचे वैद्यकिय शिक्षणाचे कागदपत्रे मागीतले परंतू तिने तिचे बीएएमएस झाल्याचे कोणतेही कागदपत्र दाखवले नाहीत. उलट साठेंविरुध्द मारहान केल्याच्या तक्रारी पोलीस स्टेशनला दिल्या आहेत. त्यामुळे साठे यांनी न्यायालयात धाव घेऊन फसवणुक झाल्याची तक्रार दिली. त्यांच्या तक्रारींवरून न्यायालयाच्या आदेशाने रामदास शंकरराव बर्फे, (सासरा) , वैशाली रामदास बर्फे,(सासू), दिक्षा निलेश साठे (पत्नी) , अंकुश रामनाथ कानडे,(पत्नीचे नातेवाईक) यांच्या विरोधात शिक्षण केवळ १२ पर्यंत असूनही बीएएमएस डॉक्टर असल्याचे खोटे सांगून विश्वासघात व फसवणुक केल्याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि रावसाहेब काकड हे करत आहेत.

---

## प्रा.डॉ.विजया मुसांडे जेएनईसीच्या प्राचार्यपदी नियुक्त होणाऱ्या पहिल्या महिला प्राचार्या



छत्रपती संभाजीनगर, दि.२७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पहिल्या महिला प्राचार्या म्हणून प्रा.डॉ.विजया मुसांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती झाल्याबद्दल प्रा.डॉ.विजया मुसांडे यांचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.प्रा.विजया मुसांडे या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १९९५ बॅचच्या संगणक अभियांत्रिकी शाखेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी आहेत. त्यांनी आपले अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करताच सन १९९६ मध्ये याच महाविद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, विभागप्रमुख, उपप्राचार्या या पदांवर त्यांनी आजपर्यंत यशस्वीपणे काम केले आहे. त्यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून कार्यभार स्वीकारला असून विद्यार्थी ते प्राचार्या हा त्यांचा प्रवास सर्वांसाठी प्रेरक असाच आहे.

---

## जायंटस ग्रुप ऑफ चिकलठाणाच्या रक्तदान शिबीरात १४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - स्व.इंदरचंदजी सज्जनराजजी मुथा यांच्या स्मरणार्थ जायंटस ग्रुप ऑफ चिकलठाणा यांच्या संयुक्त विदयमाने दिनांक २२ डिसेंबर रोजी बी.एम.जी.फिजीकल एज्युकेशन येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. स्व.इंदरचंदजी मुथा यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमीत्त हे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम या शिबीराचे सुत्रसंचालन जायंटस ग्रुप चिकलठाणा चे अध्यक्ष राहुल मुथा यांनी केले. या महारक्तदान शिबीरात १४२



रक्तदात्यांनी रक्त संकलन केले. यामध्ये दत्ताजी भाले या ब्लड बॅकेचे विशेष सहकार्य मिळाले. यावेळी गरजे व कुलकर्णी सर यांनी रक्तदान शिबीराबददल सांगीतले की, रक्तदान हे आजच्या युगात सर्वात श्रेष्ठ दान समजले जाते. एखादया व्यक्तीने केलेल्या रक्तदानाचे तीन लोकांना जीवदान मिळण्यास मदत होत असते. ते पुढे म्हणाले की, आज अनेक हॉस्पीटल मध्ये रक्ताची गरज भासते व बहुतांश प्रसंगी त्याची कमतरता असते. जायंटस ग्रुप ऑफ चिकलठाणा व मुथा परिवाराने रक्तदान शिबीर आयोजीत केले आहे ते प्रशंसनीय आहे. संपुर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष राहुल मुथा, तिलोक बाठीया, मयुर जैन, प्राजेक्ट चेअरमेन अनिता मुथा व संगीता बाठीया यांनी परिश्रम घेतले. कार्यकमाचे आभार प्रदर्शन तिलोक बाठीया यांनी केले.

---

## औषधी विक्रेता संघटना निवडणूक बिनविरोध

### अध्यक्षपदी संजय शहापूरकर तर सचिवपदी अमोल पारवरे

सोयगाव,दि.२७ डिसेंबर : तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन ची निवडणूक बिनविरोध झाले असून तालुका अध्यक्षपदी संजय शहापूरकर यांचे बिनविरोध निवड करण्यात आली. तालुक्यातील सर्व औषधी विक्रेत्यांची बैठक सोयगाव येथे झाली या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ औषधी विक्रेते रमेश जयस्वाल हे होते. प्रास्ताविक भाषणात दिनेश पंडित यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेतला त्यानंतर विनोद हातोळे,एकनाथ पाखले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर निवडणूक प्रक्रियेत तालुका अध्यक्षपदी संजय शहापूरकर,उपाध्यक्ष सचिन शिरोडे,सचिव अमोल पाखरे,सहसचिव विनोद हातोळे तर तालुका संघटक पदी एकनाथ पाखले यांचे सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यानंतर अध्यक्ष संजय शहापूरकर यांनी सांगितले की व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे तसेच ग्राहकांना दर्जेदार सेवा द्यावी नवीन वर्षात संघटनेतर्फे दुर्गम भागात आरोग्य शिबिर आयोजित करून तेथे मोफत औषधी वाटप करण्यात येईल तसेच नवनवीन कायद्याच्या माहितीसाठी औषधी विक्रेत्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर विनोद हातोळे,एकनाथ पाखले,प्रशांत चौधरी,उमेश महालपुरे,गणेश पवार,शोमराज चौधरी,विनोद सोहनी,मंगेश सोहनी,गणेश पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीला सोयगाव शहरासह फर्दापूर, बनोटी, गोंदेगाव, पळाशी, निंबायती या परिसरातील औषधी विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.प्रमोद पवार यांच्या साहित्यिक योगदानाची दखल



सोयगाव,दि.२७ डिसेंबर : डॉ. प्रमोद अंबादासराव पवार, असोसिएट प्रोफेसर आणि संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोएगाव येथील आय.क्यू.ए.सी समन्वयक यांनी त्यांच्या कार्यांचा दोन प्रमुख भारतीय विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश करून एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. कॅमेरूनमध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या डॅझलिंग ड्यूज ऑन द लीफ (२०२१) या संग्रहातील डॉ.पवार यांची मानव प्राणी ही कविता गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,बॅचलर ऑफ आर्ट्स (बीए) च्या तृतीय वर्षाच्या अंडरग्रेजुएट विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तक म्हणून विहित करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त, कॅमेरूनमध्ये प्रकाशित ट्रान्स-डिकन्स्ट्रक्शन: थिअरी ऑन मोनिझम(२०२१) हे त्यांचे अभ्यासपूर्ण पुस्तक मुंबई विद्यापीठातील मास्टर ऑफ आर्ट्स (एमए) च्या प्रथम वर्षाच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संदर्भ पुस्तक म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. डॉ. पवार यांनी ब्रिटनमधील रेजिलियन्स आणि कॅमेरूनमधील सर्वत्रिकता यासह इतर उल्लेखनीय कामे प्रकाशित केली आहेत.त्यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या थिअरी ऑफ इंटरप्रिटेशन्स या पुस्तकाचे जगभरातील समीक्षकांनी भरभरून कौतुक केले आहे. डॉ.पवार यांच्या अग्रगण्य कार्याने Trans-deconstruction आणि Trans-interpretations या दोन महत्त्वाच्या संज्ञा सादर केल्या आहेत, ज्यांना साहित्यिक सिद्धांत आणि समीक्षेमध्ये आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे.या यशाबद्दल अध्यक्ष रंगनाथ काळे, सचिव प्रकाश काळे, प्राचार्य डॉ.शिरीष पवार, डॉ.आर के बारोटे, तसेच सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

## प्रा. डॉ. सांभाळकर यांना राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर



वाळूज महानगर ( प्रतिनिधी) : संकल्प शिक्षण आणि सांस्कृतिक प्रतिष्ठान छत्रपती संभाजी नगरच्या वतीने आयोजित १४ व्या झेप साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ संजय सांभाळकर यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार २९ डिसेंबर २०२४ रोजी भोंडवे पाटील शाळा बजाजनगर येथील सभागृहामध्ये राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक प्रा डॉ ऋषिकेश कांबळे यांच्या हस्ते दिला जाणार आहे. या पुरस्काराबद्दल सर्व क्षेत्रातून डॉ. सांभाळकर यांचे अभिनंदन होत आहे.